


स्थापना-१९६२
गोदातीर ६४
मराठवाड्यातील सर्वात जुने दैनिक

# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com




* वर्ष ६४ वे * अंक ११३ * नांदेड * मंगळवार, दि. २९ एप्रिल २०२५ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

## भारत कधीही हल्ला करू शकतो, पाकिस्तानला धडकी; पाकच्या संरक्षण मंत्र्यांकडून सैन्यदलास अलर्ट

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यातील तणाव वाढला असून दोन्ही देशाचे सैन्य दल सज्ज झालं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी थेट जाहीर सभेतून पाकिस्तानला इशारा दिला असून हल्लेखोरांना कल्पनेपलिकडची शिक्षा देणार असल्याचं मोदींनी म्हटलं. तर, कॅबिनेटने सुरक्षा समितीच्या बैठकीनंतर पाकिस्तानविरुद्ध काही महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. तसेच, देशातील पाकिस्तानी नागरिकांना ४८ तासांत देश सोडण्याचेही बजावले आहे. दुसरीकडे भारतीय सैन्य दलाला सज्ज राहण्यास सांगितल्याने पाकिस्तानाला धडकी भरली आहे. पाकिस्तानचे संरक्षणमंत्री ख्वाजा मोहम्मद आसिफ यांनी मोठं वक्तव्य केलं आहे. भारत कधी पण हल्ला करू शकतो, असे आसिफ यांनी म्हटलं आहे.



भारत कधीही हल्ला करू शकतो, त्यामुळे पाकिस्तान सैन्य दलाने अलर्ट राहावे, अशा सूचना पाकिस्तानच्या संरक्षणमंत्र्यांनी दिल्या आहेत. ख्वाजा आसिफ यांनी म्हटलं की, पाकिस्तान सैन्याने भारताकडून संभाव्य हल्ल्याबाबत माहिती दिली आहे. पाकिस्तान पूर्णपणे अलर्ट आहे, पाकिस्तान तेव्हाच परमाणू हत्यारांचा वापर करेल जेव्हा आमच्या अस्तित्वाला धोका असेल, असे ख्वाजा यांनी म्हटलंय. दरम्यान, यापूर्वी सिंधू जल करारासंदर्भात भारताने घेतलेल्या निर्णयानंतरही ख्वाजा यांनी प्रतिक्रिया दिली होती. भारत पाण्याला एका शस्त्रासारखं वापरत असल्याचं त्यांनी म्हटलं होतं.

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर पाकिस्तावर आणि दहशतवाद्यांवर कारवाई करावी, अशी मागणी देशभरातून होत आहे. भारतीय सैन्य दलही सज्ज झालं असून केंद्रीय स्तरावर सातत्याने घडामोडी घडत आहेत. भारताने पाकिस्तानविरुद्ध काही ठोस निर्णय घेतले असून भारताकडून पाकिस्तानला जोरदार प्रत्युत्तर दिलं जाईल, असा राजकीय अंदाजही लावण्यात येत आहे.

दरम्यान, पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यात २६ निष्पाप भारतीयांना आपला जीव गमवावा लागला. त्यामध्ये, महाराष्ट्रातील ६ नागरीक ठार झाले आहेत. या हल्ल्यानंतर काश्मीर पर्यटनासाठी बुकींग केलेल्या हजारो पर्यटक नागरिकांना आपलं बुकींग रद्द केलं असून तेथील पर्यटनावर या हल्ल्याचा मोठा परिणाम झाल्याचं पाहायला मिळत आहे.

पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारतीय नौदलाची ताकद वाढवण्यासाठी भारत आणि फ्रान्समध्ये २६ राफेल नौदल लढाऊ विमानांच्या खरेदीसाठी ६३,००० कोटी रुपयांचा म हत्त्वपूर्ण संरक्षण करार करण्यात आल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. दिल्लीतील बैठकीत या करारावर दोन्ही देशांनी स्वाक्षऱ्या केल्याचे समजते. या करारामुळे भारतीय नौदलाची सामरिक क्षमता मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. नव्या करारामुळे भारताकडे असलेल्या राफेल लढाऊ विमानांची एकूण संख्या आता ६२ वर पोहोचणार आहे.

## राज्याला हादरवणाऱ्या शिक्षण विभागातील घोटाळ्याप्रकरणी ईडीकडून दखल; आरोपींचा तपशील मागितला

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्याला हादरवणाऱ्या शिक्षण विभागातील शालार्थ आयडी घोटाळा आणि अपात्र मुख्याध्यापक भरती घोटाळ्याची दखल आता ईडीने घेतली आहे. या घोटाळ्यासंदर्भात दाखल केलेल्या गुन्ह्याची प्रत, रिमांडची कॉपी, आरोपींचे बयान, आरोपींच्या बँक खात्यांचा तपशील आणि आतापर्यंत तपासातील इतर माहिती ईडीने पोलिसांकडून मागितली आहे. त्यामुळे या घोट्याळ्याशी संबंधितांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे.

शालार्थ आयडी घोटाळ्याचा नागपूर सायबर पोलिसांकडून तांत्रिक तपास करण्यात येत आहे. सायबर पोलिसांनी एनआयसी आणि महाआयटी सर्वरकडून या घोटाळ्या संदर्भात माहिती मागितलेली आहे. दरम्यान राज्य सरकारने ही शिक्षण क्षेत्रातून या एसआयटीच्या माध्यमातून तपास करण्यात यावा, अशी मागणी होत असताना याच प्रकरणात एसआयटी स्थापन करण्याच्या दृष्टीने पावलं उचलली आहेत.

## वाळू माफियांचा महसूल पथकावर हल्ला; नांदेड ग्रामीण ठाण्यात गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यातील वेगवेगळ्या भागात पोलीस प्रशासनाने वाळू माफियांविरुद्ध कारवाई सुरू केली आहे. शनिवार, दि.२६ एप्रिल रोजी रात्री नायब तहसिलदारांचा समावेश असलेल्या महसूलच्या पथकावर वाळू माफियांनी हल्ला चढवला. रविवारी या प्रकरणात गुन्हा दाखल झाल्यानंतर एकाला ताब्यात घेण्यात आले आहे. विशेष म्हणजे या घटनेची वाच्यता होऊ नये, याची काळजी महसूल प्रशासनाने घेतली.

नांदेड जिल्ह्यातील वेगवेगळ्या भागातील वाळू घाटांचा लिलाव प्रलंबित आहे. महसूल मंत्र्यांच्या आदेशानंतर पोलीस यंत्रणेने वाळू माफियांविरुद्ध कारवाई सुरू केली आहे.

शनिवारी रात्री नांदेडचे नायब तहसिलदार स्वप्नील दिग्गलवार हे आपल्या पथकासमवेत वाडी पाटी येथे कारवाई करण्यासाठी गेले असताना त्यांच्यावर वाळू माफियांनी दगडफेक केली. त्यांच्या समवेत दोन तलाठी, कोतवाल व पोलीस कर्मचारी होते. दगडफेक केल्यानंतर संबंधित वाळू माफियांनी पथकाने पकडलेला हायवा पळवून नेला. विशेष म्हणजे हायवा गाडी लातूर जिल्ह्याच्या पासिंगची होता.

शहरातील असर्जन, विष्णुपुरी भागात मोठ्या प्रमाणावर वाळू उपसा होत असल्याच्या तक्रारी आल्यानंतर कारवाई करण्यासाठी हे पथक गेले होते. त्यांच्यावर झालेल्या हल्ल्यात सुदैवाने कोणीही जखमी झाले नाही. हा प्रकार घडल्यानंतर नायब तहसिलदार स्वप्नील दिग्गलवार यांनी ग्रामीण पोलीस ठाणे गाठले. तेथे रितसर तक्रार दिल्यानंतर गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणात एका आरोपीला अटक करण्यात आली आहे. शिवाय हायवा गाडी जप्त करण्यात आल्याची माहिती पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी दिली.

## जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात प्रतिबंधात्मक आदेश

**नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र दिनानिमित्त १ मे रोजी ध्वजारोहणाचा कार्यक्रम पार पडणार आहे. या कार्यक्रमावेळी कोणताही अनुचित प्रकार घडू नये यादृष्टीकोनातून जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात प्रतिबंधात्मक आदेश निर्गमीत करण्यात आला आहे.

या आदेशानुसार जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड समोरील मुख्य रस्ता, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा ते श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा ते जिल्हाधिकारी कार्यालय ते महात्मा गांधी पुतळा ते महावीर चौक पर्यंतच्या परिसरातील मुख्य रोडवर भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करून जिल्हादंडाधिकारी राहुल कर्डिले यांनी २९ एप्रिल २०२५ रोजीचे ००.०० वाजेपासून (२८ एप्रिल २०२५ चे मध्यरात्री २४.०० वाजेपासून) ते ३ मे २०२५ च्या मध्यरात्रीपर्यंत उपोषणे, आत्मदहने, धरणे, मोर्चे, रॅली, सत्याग्रह इत्यादी आंदोलनात्मक आयोजनास प्रतिबंध केले आहे. संबंधीतावर नोटीस बजावून त्यांचे म्हणने ऐकूण घेण्यास पुरेसा अवधी नसल्याने आणीबाणीच्या प्रसंगी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ (२) नुसार एकतर्फी आदेश निर्गमीत करण्यात आला आहे, असेही आदेशात नमूद केले आहे.


## नांदेड जिल्ह्यासाठी ४ दिवस येलो अलर्ट

**नांदेड (प्रतिनिधी)–** प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र मुंबई यांनी सोमवारी दिलेल्या सूचनेनुसार नांदेड जिल्ह्यासाठी दि. २९, ३० एप्रिल व १, २ मे २०२५ हे चार दिवस येलो अलर्ट जारी केलेला आहे. २९ व ३० एप्रिल या दोन दिवसांच्या काळात जिल्ह्यात तुरळक ठिकाणी उष्ण आणि दमट हवामान राहण्याची अधिक शक्यता वर्तविण्यात आली आहे. तर १ मे रोजी जिल्ह्यात तुरळक ठिकाणी उष्ण आणि दमट हवामान राहण्याची व दुपारनंतर संध्याकाळी विजेचा कडकडाट व ढगांच्या गडगडाटासह हलक्या स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे. तसेच २ मे रोजी जिल्ह्यात तुरळक ठिकाणी ताशी ३० ते ४० किमी वेगाने वादळी वारे वाहण्याची, विजेचा कडकडाट ढगांच्या गडगडाटासह हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची अधिक शक्यता वर्तविली आहे.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांचा विशेष सन्मान

**नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाची दशकपुर्ती आणि प्रथम सेवा हक्क दिनानिमित्त सोमवारी मुंबई येथे अतिथीगृहात आयोजित राज्यस्तरीय सोहळयामध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नांदेडचे आताचे जिल्हाधिकारी तथा तत्कालिन वर्धा जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांचा विशेष सन्मान करुन त्यांना विशेष कामगिरीबाबत गौरव करण्यात आला.

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले हे जिल्हाधिकारी वर्धा या पदावर कार्यरत असताना, महाराष्ट्र सेवा हक्क अधिनियम, २०२५ च्या प्रभावी अंम लबजावणीसाठी त्यांनी 'सेवा दूत' हा नाविण्यपूर्ण उपक्रम राबवून नागरिकांना अधिक सुलभतेने सेवा पुरविण्यासाठी विशेष कामगिरी केली. या विशेष कामगिरीबाबत केलेल्या प्रयत्नांना प्राप्त झालेल्या यशाबद्दल त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला



आहे. हा उपक्रम संपूर्ण राज्यासाठी एक आदर्श प्रस्थापित झाला आहे. या कामगिरीबाबत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला आहे.



**नांदेड :** युपीएससी परीक्षेत नांदेडचे डॉ. शिवराज गंगावळ यांनी देशात ७८८ वा क्रमांक मिळवत यश मिळविले आहे. त्यांच्या या यशाबद्दल भार्गव अकॅडमीचे भार्गव राजे यांच्या हस्ते त्यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. त्याप्रसंगीच्या छायाचित्रात डॉ. सौ. प्रतीक्षा शिवराज गंगावळ यांच्यासह दै. 'गोदातीर समाचार'चे मुख्य संपादक केशव घोणसे पाटील, उद्योजक बालाजी इबितदार, गजानन पाटील मुधोळ, महेश राजे, प्रा. डॉ. शिवराज शिरसाठ, प्रा. डॉ. अनिलकुमार जाधव, प्रा. सुनील जाधव, प्रा. डॉ. सचिन रवंदे, मधुसूदन देशमुख आदी दिसत आहेत.

## नकली पिस्तूल इंस्टाग्रामवर व्हायरल करून तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करणारा ग्रामीण पोलिसांच्या ताब्यात

**नांदेड (प्रतिनिधी)–** नकली पिस्तूल बाळगून त्याचा फोटो इन्स्टाग्रामवर व्हायरल करणाऱ्यास नांदेड ग्रामीण पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्याच्याकडून नकली पिस्तूलसह १० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला.

पोलीस अधीक्षक अबिनाश कुम ार यांनी सुरू केलेल्या ऑपरेशन फ्लश आऊट अंतर्गत नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंलोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली दि. २८ एप्रिल रोजी पोउपनि मटवाड व सोबत गुन्हे शोध पथकातील



अंमलदार हे ग्रामीण हद्दीत पेट्रोलिंग करित असताना त्यांना शेख नदीम शेख मंजूर (वय ३१) रा. आमेना मनीदजवळ मंलगबाबा बिल्डींग खुदबेईनगर हा नकली लोखंडी पिस्तूल, छरे उडवण्याची एअर गन (बंदुक) सोबत घेऊन इंस्टाग्रामवर व्हिडिओ अपलोड केला. अशा प्रकारे इंस्टाग्राम आयडीवर रिल्स तयार करून सर्व सामान्य जनतेत भीती व दहशत निर्माण होईल शक्यता आहे. ही सार्वजनिक शांततेविरुध्द अपराध करु शकते, याची शक्यता असतानाही जाणिवपुर्वक सदरचे रिल तयार करुन ते इंस्टाग्रामवर पोस्ट केल्याने मिळून आला. याप्रकरणी गुन्हा दाखल करत त्याच्याकडून नकली लोखंडी पिस्तूल, व १ एअर गन (बंदूक) असा एकूण १० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. या कारवाई पथकात उपविभागीय पोलीस अधिकारी सुशीलकुमार नायक यांच्या मार्गदर्शनाखाली पोहेकॉ वसंत केंद्रे, सुनिल गटलेवार, विष्णू कल्याणकर, रामदास आवळे यांचा समावेश होता.

## एसटी महामंडळाची श्वेतपत्रिका, मेडिक्लेम योजना, हॉटेल थांब्यासाठी नवं धोरण; परिवहन मंत्र्यांचे निर्देश

**मुंबई (प्रतिनिधी)–** एसटी महामंडळाची (एसटी) आर्थिक स्थिती समजून घेण्यासाठी, तसेच भविष्यातील नियोजना करता, एक आर्थिक श्वेतपत्रिका तयार करावी. असे निर्देश परिवहन मंत्री तथा एस टी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी एसटी प्रशासनाला दिले आहेत. आज एसटीच्या मुख्यालयात झालेल्या बैठकीमध्ये ते बोलत होते. यावेळी एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर, वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी गिरीश देशमुख यांचे सह सर्व खात्याचे प्रमुख उपस्थित होते.

पुढे बोलताना ते म्हणाले, सुमारे १० हजार कोटी संचित तोटा सहन करणाऱ्या एसटी महामंडळाला कर्मचाऱ्यांचे वेतन, वाहन खरेदी, टायर खरेदी, इंधन खरेदी, स्थानकाचे नूतनीकरण व इतर आस्थापना खर्चासाठी दररोज आर्थिक कसरत करावी लागते. कर्मचाऱ्यांचे देणी, भविष्य निर्वाह निधीचे हप्ते, कामगार करारातील प्रलंबित देणी या साठी महामंडळाला पैशाची गरज आहे. याबरोबरच महामंडळाला इंधन,वस्तु व सेवा पुरविणाऱ्या संस्थांची थकीत देणी या सर्व घटकांचा विचार करून एसटी महामंडळाला सध्या किती उत्पन्न मिळते? किती खर्च येतो? तसेच किती देणी बाकी आहेत. या सर्वांचा लेखा-जोखा मांडणारी एक श्वेतपत्रिका काढणे अत्यंत आवश्यक असून त्यातून एक आर्थिक शिस्त निर्माण करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन मंत्री सरनाईक यांनी यावेळी केले.

नुकत्याच संपन्न झालेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये मुख्यमंत्री महोदय यांनी सभागृहाला आश्वासित केल्याप्रमाणे १३१० बसेस भाडेतत्त्वावर घेण्याच्या एकूण प्रकरणाची चौकशी तटस्थ व्यक्तीमार्फत केली जाईल, तशा सूचना अतिरिक्त मुख्य सचिव (परिवहन) यांना देण्यात येतील. अशी माहिती मंत्री सरनाईक यांनी यावेळी दिली.

## अवैध वाळू उपसा प्रकरणी लिंबगाव पोलिसांची कारवाई; दहा तराफे जाळले, दोन इंजिन जप्त



**नांदेड (प्रतिनिधी)–** तालुक्यातील लिंबगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैधरित्या वाळू उपसा करणारे दोन इंजिन जप्त करून दहा तराफे नष्ट करण्यात आले आहे. ही कारवाई महसूल आणि लिंबगाव पोलिसांच्या संयुक्त पथकाने केली. या प्रकरणी लिंबगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नांदेड जिल्ह्यामध्ये अवैध मार्गाने वाळू उपसा व चोरटी वाळू वाहतुक करून शासनाचा लाखो रुपयाचा महसूत बुडविला जात असल्याने पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांनी पोस्टे हद्दीत अवैध वाळू उपसा वाहतुक संदभांने ऑपरेशन फ्लश आऊट अंतर्गत कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्या अनुषंगाने पोलीस स्टेशन लिंबगांव येथील सहायक पोलीस निरीक्षक पंढरीनाथ बोधनकर व त्यांचे सहकारी रितेश टाक, चालक सोनकले, ६ होमगार्ड व तहसीलदार संजय वारकड यांच्या मार्गदर्शनानुसार महसूल विभागाचे मंडल अधिकारी कुणाल जगताप, तलाठी विजय रणवीरकर, तलाठी संजय खंडकर असे संयुक्तीक कारवाई करण्याकामी बोरगांव (तेलंग) येथील जुने गावठाण लगत असलेल्या ठिकाणी गेले असता दोन तराफ्यावर दोन अनोळखी इसम दोन इंजिनच्या सहाय्याने अवैध गौण खनिज (वाळू) उपसा करून चोरी करताना पोलीस पथकास पाहून पळून गेले. त्यावेळी सदर नदीपात्रामधून अवैध गौण खनिज बाहेर काढण्यात येणारे १० तराफे व २ इंजिन नदी पात्राच्या बाहेर काढता येत नसल्याने नदी पात्राचे किनाऱ्यावर आणुन ते डिझेलच्या सहाय्याने जागीच नष्ट केले आहे. सदर दोन इंजिनची किंमत ८ लाख रुपये व दहा तराफेची किंमत ५ लाख रुपये असा एकूण १३ लाख रुपयांचा मुद्देमाल जागीच नष्ट करण्यात आला. याप्रकरणी अनोळखी दोन वाळू माफियांवर लिंबगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## अश्लील कंटेंटच्या ऑनलाईन स्ट्रीमिंगवर बंदी घालण्याची मागणी

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** सोमवारी, सर्वोच्च न्यायालयात पोर्नोग्राफिक कंटेंटच्या ऑनलाइन स्ट्रीमिंगवर बंदी घालण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवर सुनावणी झाली. न्यायालयाने केंद्र सरकार आणि ९ ओटीटी-सोशल मीडिया प्लॅटफॉर्मना नोटीस बजावली आहे आणि त्यांचे उत्तर मागितले आहे. न्यायमूर्ती बीआर गवई आणि ऑगस्टीन जॉर्ज मसीह यांच्या खंडपीठाने म्हटले आहे की, ही याचिका गंभीर चिंता निर्माण करते. केंद्राने यावर काही कारवाई करण्याची गरज आहे. हे प्रकरण कार्यकारी मंडळाच्या किंवा विधिमंडळाच्या अधिकारक्षेत्रात येते. आमच्यावर असेही आरोप आहेत की आम्ही कार्यकारी मंडळाच्या अधिकारक्षेत्रात हस्तक्षेप करतो. तरीही, आम्ही नोटीस बजावत आहोत.

केंद्र सरकारतर्फे बाजू मांडणारे सॉलिसिटर जनरल तुषार मेहता म्हणाले की, ओटीटी आणि सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरील कंटेंटबाबत काही नियम आधीच अस्तित्वात आहेत. सरकार आणखी नवीन नियम लागू करण्याचा विचार करत आहे. याचिकाकर्त्याच्या वतीने वकील विष्णू शंकर जैन यांनी बाजू मांडली. खरं तर, ओटीटी आणि सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरील अश्लील सामग्रीवर बंदी घालण्यासाठी केंद्र सरकारला मार्गदर्शक तत्त्वे जारी करण्याची मागणी सर्वोच्च न्यायालयात करण्यात आली आहे. याचिकाकर्त्याचा असा युक्तिवाद आहे की अशा कंटेन्टचा तरुणांवर आणि समाजावर नकारात्मक परिणाम होतो. उपराष्ट्रपती जगदीप धनखड आणि भाजप खासदार निशिकांत दुबे यांनी अलिकडेच केलेल्या टिप्पणीनंतर सर्वोच्च न्यायालयाने ही टिप्पणी केली आहे. दोघांनीही न्यायालयावर न्यायालयीन अतिक्रमणाचा आरोप केला होता. तेव्हापासून सर्वोच्च न्यायालयाच्या अधिकारक्षेत्राबाबत वाद सुरू आहे. धनखड यांनी २३ एप्रिल रोजी संसद सर्वोच्च असल्याचे म्हटले होते.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

# सुधारणा ही निवड नाही, ती गरज!

भारताची कारागृहे आज प्रचंड संकटात सापडली आहेत. तुरुंगातील गोंधळ वाढतो आहे, आणि ही केवळ स्थानिक समस्या नाही, तर ती एक राष्ट्रीय मानवाधिकार आपत्ती ठरत आहे. इंडिया जस्टिस रिपोर्ट २०२५ नुसार, देशातील तुरुंगांमध्ये सरासरी क्षमतेपेक्षा १३१ टक्के अधिक बंदिवान आहेत. यातील अनेक तुरुंग तर त्यांच्या अधिकृत क्षमतेच्या चार पट बंदीवानांना सांभाळत आहेत. या स्थितीमागचं मूळ कारण म्हणजे वाढत्या प्रमाणात वाढणारे अंडरट्रायल्स म्हणजेच न्यायालयीन निर्णय होण्याआधीच वर्षानुवर्षे तुरुंगात थांबवले गेलेले आरोपी. आज देशातील एकूण बंदिवानांपैकी ७६ टक्के म्हणजे तीनपैकी दोन बंदिवान हे न्यायप्रविष्ठ आहेत. या ताणतणावाखाली दबलेल्या तुरुंग व्यवस्थेत मानवी हक्कांची पायमल्ली नित्याची गोष्ट झाली आहे. एका बाजूला बंदीवानांची संख्या वेगाने वाढते आहे. २०३० पर्यंत ही संख्या ६.८ लाखांपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. तर दुसऱ्या बाजूला तुरुंगांची क्षमता ५.१५ लाखांवरच राहणार आहे. मागील दहा वर्षांत तुरुंगांच्या आणि बंदिवानांच्या देखभालीसाठीचा खर्च अनुक्रमे १५६ आणि १९२ टक्केने वाढवण्यात आला आहे, तरीही समस्या सुटत नाहीये. कारण ही केवळ जागेची किंवा पैशांची नाही, ही माणसांच्या जगण्याची लढाई आहे. संपूर्ण देशात तुरुंगातील मानसिक आजारांसाठी केवळ २५ मानसोपचारतज्ज्ञ उपलब्ध आहेत. २०१२ पासून बंदिवानांमध्ये मानसिक आजाराचे प्रमाण दुप्पट झाले आहे. पण त्यांच्यावर उपचार करायला पुरेशी साधने नाहीत. वैद्यकीय सुविधा तर अजूनच कमकुवत. देशभरात ४३ टक्के वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे रिकामी आहेत. या सर्व गोष्टींचा सर्वाधिक फटका न्यायप्रविष्ठ आरोपींना बसतो. हे लोक जे न्याय मिळेपर्यंत दोषी ठरलेलेही नाहीत, पण तुरुंगात खितपत पडले आहेत. वर्षानुवर्षे कोर्टाच्या तारखा काढत ते मानवी हक्कांपासून दूर, स्वाभिमाना-शिवाय जगतात. या परिस्थितीवर न्यायालयाने अनेकदा चिंता व्यक्त केली आहे. सुप्रीम कोर्टाने वेळोवेळी दीर्घकालीन तुरुंग सुधारणा आराखड्यांची गरज अधोरेखित केली आहे. पण राज्य सरकारांचे प्रतिसाद संथ आणि थातुरमातुरच राहतात. अनेक तुरुंगांमध्ये ६० टक्के कारागृह कर्मचाऱ्यांची पदे रिकामी आहेत. या तुरुंगांमध्ये एक वेगळी विषमता स्पष्ट दिसते. हे सामाजिक आणि न्यायप्रणालीतील मूलभूत अन्यायाचे लक्षण आहे. न्यायमूर्ती अमिता रॉय समितीच्या २०२३ च्या अहवालात देशातील १,३८२ तुरुंगांतील अमानवीय जीवनस्थितींचे स्पष्ट चित्रण आहे. म्हणून फक्त तुरुंगांची क्षमता वाढवून काही उपयोग नाही, तर तुरुंग प्रशासनात आणि संपूर्ण न्यायव्यवस्थेत सुधारणा आवश्यक आहेत. २०१२ ते २०२२ दरम्यान भारतातील तुरुंगांची क्षमता २७ टक्केने वाढली खरी, पण बंदिवानांची संख्या ४८ टक्केने वाढली. म्हणूनच तुरुंगातील जीवनशैली अजूनही दयनीयच राहिली आहे. या स्थितीतून मार्ग काढण्यासाठी केवळ तात्पुरती डागडुजी चालणार नाही, तर राजकीय इच्छाशक्ती आवश्यक आहे. न्यायालयीन प्रक्रियेतील विलंब कमी करण्यासाठी जलद गती न्यायालय, पर्यायी वाद निराकरण यंत्रणा, आणि गरिबांसाठी प्रभावी कायदेशीर मदत यांची तातडीने अंमलबजावणी हवी. तुरुंगातील मूलभूत सुविधा आणि मानवी संसाधने वाढवण्याची गरज आहे. आपला देश संवेदनशील आणि मानवतावादी व लोकशाहीवादी आहे. म्हणूनच हे ओळखले पाहिजे की, तुरुंग ही शिक्षा नाही, ती सुधारणा आणि त्यामध्ये पुनर्वसनाची संधी असली पाहिजे. बंदिवानांशी आदराने, सहानुभूतीने आणि संवेदनशीलतेने वागणे हे आपल्या लोकशाहीचे बळ आहे. ही कृपा नव्हे, हे आपले संविधानिक कर्तव्य आहे. जर आपल्या देशात तुरुंगातील लोकांनाही माणूस म्हणून वागणूक मिळत नसेल, तर ती लोकशाहीची सर्वात मोठी हार ठरेल.

# मोबाईलने बालपण हिरावून मानवी दिनचर्येवर घणाघाती प्रहार

आपण म्हणतो बालपण देगा देवा! परंतु आज आपले बालपण मोबाईल हिरावून घेत आहे ही अत्यंत चिंताजनक बाब आहे. स्मार्टफोन दिवसेंदिवस छोट्या-छोट्या बालकांसाठी व युवावर्गांसाठी घातक सिद्ध होत आहे. त्याचप्रमाणे शाळांमध्ये सुध्दा विद्यार्थीवर्ग मोबाईलचा मोठ्या प्रमाणात वापर करीत आहे व यांचे दुष्परिणाम हळूहळू सामोरं येताना दिसत आहेत. एक वर्षांवरील मुलं रडतात म्हणून आई-वडील मुलांच्या हातात मोबाईल देऊन आपली सुटका करून घेतात. याचेही दुष्परिणाम हळूहळू समोर येताना दिसत आहेत. ही परिस्थिती फक्त भारतातच नाही तर संपूर्ण जगात आपल्याला पहायला मिळते. यामुळे जगातील संपूर्ण शाळांनी मोबाईलवर बंदी आणावी असा सुचक सल्ला युनेस्कोने दिला आहे.

देशासह जगात डिजिटल क्रांती झाली अवश्य, परंतु त्याचा गैरवापर विद्यार्थ्यांच्या व युवकांच्या अंगाशी येताना दिसत आहे. सोबतच बालवयात आई-वडील मुलांना मोबाईलच्या आहारी टाकताना दिसतात. स्मार्टफोनमुळे सामाजिक, व्यावहारिक व इतर क्षेत्रात आमूलाग्र बदल झाल्याचे आपल्याला दिसून येते. आज मोबाईलच्या अतिवापरामुळे कोणीही कोणासोबत समक्ष बोलायला तयार नाही. घरात सर्वसाधारण चर्चा करायला तयार नाही, कोणत्याही गोष्टीची बोलण्यातून देवाणघेवाण किंवा आदानप्रदान होत नाही, कारण एक वर्षांच्या मुलांपासून ते मोठ्या पर्यंत सर्वच घंटो-न-घंटे मोबाईलमध्ये व्यस्त असतात.

पालक आपल्या जबाबदारीपासून पळ काढण्यासाठी व अतिलाडामुळे चिमुकले सुध्दा मोबाईलच्या आहारी गेले आहेत. यामुळे मानसिक आजार वाढण्याची दाट शक्यता आहे आणि वाढत आहे. मोबाईलच्या गेमम ध्ये युवावर्ग दिवसेंदिवस फसताना दिसत आहे. याचे मुख्य कारण म्हणजे भारतात युवावर्ग मोठ्या प्रमाणात मोबाईलच्या अधीन गेले आहेत. यामुळे त्यांना अनेक व्याधींचा सामना करावा लागतो आहे. शिक्षण क्षेत्रातील डिजिटल क्रांती विद्यार्थ्यांसाठी चिंताजनक असल्याचे मत युनेस्कोच्या अहवालातून समोर आले आहे. मोबाईलचा अतिरिक्त वापर झाल्याने शैक्षणिक कामगिरी मंदावते. स्क्रीन टाईम वाढल्याने मुलांच्या भावनिक स्थिरतेवर नकारात्मक परिणाम होतो. परिणामी, मुले चिडचिडे व रागीट बनतात असेही युनेस्कोने म्हटले आहे. यामुळे मुलांमधील फिजिकल ॲक्टिव्हीटी दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात कमी होतांना दिसत आहे हा अत्यंत चिंतेचा आणि गंभीर विषय आहे.



देशात ७४ टक्के मुले (११ ते १७ वयोगटातील) रोज ३० मिनीटेही मैदानी खेळ खेळत नाही. त्याचप्रमाणे १६ ते ३४ वयोगटातील ५९ टक्के लोक ऑनलाईन खेळ ३-३ तास खेळण्यात मग्न असतात. म्हणजेच आजची युवा पिढी मोबाईलच्या खेळांमध्ये (गेममध्ये) किंवा सिरीयल पहाण्यात मोठ्या प्रमाणात मग्न असल्याचे स्पष्ट दिसून येते. यामुळे शरीराला आवश्यकतेनुसार पाहिजे तेवढा व्यायाम मिळत नाही. डब्लुएचओच्या रिपोर्टनुसार भारतात ११ ते १७ वयोगटातील ७४ टक्के मुले फिजीकल ॲक्टिव्ह नसल्याचे सांगितले जात आहे. म्हणजेच एका आठवड्यात मुलं १५० मिनिटसुध्दा खेळत नाहीत किंवा शारीरिक हालचाली ज्या पद्धतीने पाहिजेत त्या पद्धतीने दिसून येत नाहीत. यावरून स्पष्ट होते की, आजचा विद्यार्थीवर्ग व युवावर्ग दिवसेंदिवस डोक्यानी कितीही हुशार असेल, परंतु शारीरिकदृष्ट्या दिवसेंदिवस खालावत असल्याचे दिसून येते. देशातील ४१ टक्के लोक मोबाईलच्या नादामुळे शारीरिक व्यायामाच्या दृष्टीकोनातून ॲक्टिव नसल्याचे दिसून येते. म्हणजे आज बालपणापासून तर युवा वर्गापर्यंत आणि युवावर्गापासून तर वयस्कर लोकांना सुद्धा मोबाईलने चांगलेच जखडल्याचे आपण पहातो. यामुळे शरीराला ज्या पद्धतीने आणि ज्याप्रमाणात व्यायामाची आवश्यकता आणि गरज आहे तो मिळत नसल्याने अनेक व्याधी किंवा आजार बालकांमध्ये, युवावर्गामध्ये व अन्य लोकांम ध्ये दिसून येते व यांचा परिणाम आरोग्यावर मोठ्या प्रमाणात विपरीत परिणाम होत आहे.

आज भारतातच नाही तर संपूर्ण जगात मोबाईलशिवाय जीवन अधुरे असल्याचे सर्वांना वाटते. परंतु मोबाईलचा वापर दिवसेंदिवस मानवाच्या दृष्टीकोनातून अत्यंत घातक सिद्ध होत आहे हेही तितकेच सत्य आहे, याला कोणीही नाकारू शकत नाही. म्हणजेच मोबाईलचा अती वापर जीवघेणा सिद्ध होवू शकते यालाही नाकारता येत नाही. मानवाच्या मेंदूला (मस्तिष्कला) रक्तपुरवठा व्यवस्थित आणि सुरळीत झाला नाही तर (स्ट्रोक) होण्याचे मोठे कारण ठरू शकते. स्ट्रोक म्हणजे पॅरालिसीसचा ॲटॅक अथवा लकवा किंवा ब्रेन टॅक असेही म्हणतात. देशात स्ट्रोकच्या आजाराचे जवळपास ६५ लाख रूग्ण असल्याचे सांगितले जाते. म्हणजेच आजच्या घडीला मोबाईलच्या अती वापरामुळे मानवजाती अत्यंत धोकादायक स्थितीत आल्याचे समजते. ही बाब स्पष्ट होते की मोबाईलच्या अती वापरामुळे लठ्ठपणा, शुगर (मधुमेह), डोळ्यांचा आजार, मानेचा त्रास, मानसिक त्रास, हार्टच्या आजारासह अनेक आजार मानवाच्या शरिरात घर करीत आहे.याचे मुख्य कारण म्हणजे शरीरातील अवयवांना पाहिजे त्याप्रमाणात व्यायाम मिळतच नाही. त्यामुळे ही कठीण परिस्थिती उध्दभवत आहे. मानवाला मोबाईलमुळे जेवढा आनंद मिळतो त्यापेक्षा जास्त धोका मोबाईलमुळे होणाऱ्या आजारामुळे निर्माण होत आहे. त्यामुळे मोबाईलचा वापर कमीत कमी कसा करता येईल व आपल्याला शारीरिकदृष्ट्या कोणताही धोका निर्माण होणार नाही यापध्दतीने मोबाईलचा वापर व्हायला हवा.

अमेरिकन ॲकेडमी ऑफ पीडियाट्रिक्स या संस्थेने एका संशोधनात म्हटले आहे की, दोन ते चार वर्षांच्या मुलांनी दिवसातून फार तर एक तास फोन वापरणे योग्य असल्याचे संशोधनात म्हटले आहे. चार वर्षांपेक्षा जास्त वयाच्या मुलांनी दररोज दोन तास मोबाईल वापरणे योग्य आहे. यापेक्षा जास्त मोबाईल वापरल्यास डोळ्यासोबतच मानसिक आरोग्यावरही विपरीत परिणाम होतो. यानंतर यांचे भयंकर परिणाम भोगावे लागू शकतात.आपण काय करायचं आणि काय करू नये हे आपणच ठरवू शकतो व धोकादायक वस्तूपासून दूर राहु शकतो.

आज आपण पहातो ३ ते २० वर्षे वयोगटातील मुले-मुली टीव्ही पहाताना, जेवतांना मोबाईलला चीपकुन राहतात. जनुकाय मोबाईल बीना जीवन अधुरे आहे की काय, अशी परिस्थिती दिसून येते. याचा दुष्परिणाम पुढे चालून भयानक होवू शकतो. छोटे मुलं रडायला लागले की, आई-वडील त्यांच्या हातात मोबाईल देऊन मोकळे होतात, परंतु हे घातक आहे. त्यामुळे पालकांना आग्रहाची विनंती की, मुलांना मोबाईलपासून जितके दूर ठेवता येईल तितके दूर ठेवलेच पाहिजे. यामुळे मुलांना फिजिकल ॲक्टीव्हीटी किंवा व्यायाम करण्यास मदत होईल. मोबाईलचा अती वापर शरीराला घातक आहेच त्याचबरोबर त्याचा गैरवापर केला तर जीवाला सुध्दा धोका निर्माण होऊ शकतो आणि होत आहे. आजही लोक वाहन चालवितांना मोबाईलवर बोलत रहातात यामुळे अनेक दुर्घटना झाल्याचे आपण पहातो आणि यामुळे देशात मोठ्या प्रमाणात जीवित हानी सुध्दा झाल्या आहेत. मोबाईल वापरायला हरकत नाही.परंतु त्याचा योग्यवेळी आणि कमीत कमी वापर व्हायला पाहिजे. अन्यथा मोबाईलमुळे जेवढे सुख आणि आनंद मिळतो. त्यापेक्षा हजारो पटीने आपल्याला यातना किंवा दुःख भोगाव्या लागतील हेही तितकेच सत्य आहे. त्यामुळे मुलांनी मोबाईल हातात घेण्यापेक्षा पुस्तक, वर्तमानपत्र हातात घेतले तर बुध्दीचा विकास झपाट्याने होईल व पुस्तकी ज्ञानामुळे शरीराच्या विकासाला मोठी चालना मिळेल. आपण एकंदरीत विचार केला तर मोबाईल युगामुळे देशातील मातीतील छोटे-छोटे खेळ नामशेष झाले किंवा होण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे अनेक आजारांचा सामना करावा लागतो आहे. आजच्या युवापिढीला जुने खेळ काय होते ते सुद्धा माहिती नाही आणि या संपूर्ण गोष्टी मोबाईलमुळे उध्दभवतांना दिसते. म्हणजेच आजचे मोबाईल युग बालकांसाठी, युवा वर्गासाठी किंवा विद्यार्थांना शारीरिकदृष्ट्या अपंग करीत असल्याचे दिसून येते. यावरून असे लक्षात येते की, वर्चुअल खेळांमुळे रियल खेळ हळूहळू नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. आज मोबाईलची दुनिया पहाता असे वाटते, कहा गये ओ दिन!

**-रमेश लांजेवार**
नागपूर
मो. ९९२१६९०७७९

# मायबापाच्या सेवेतून परिणामकारक निष्पत्ती

मायबाप देवच असतात. ते आपल्याला जन्माला घालतात. म्हणूनच आपल्याला जग बघता येतं. त्यांनी जर जन्मच दिला नाहीतर आपल्याला जगही पाहता येणार नाही आणि त्याचबरोबर देव, धर्मही हे निर्वीवाद सत्य आहे. मायबाप आहेत, म्हणून आपण आहोत. मायबाप नसते तर आपणही नसतो हेही तेवढंच खरं.

आज स्पर्धाकाळ आहे. या स्पर्धाकाळात आपल्याला नोकरीची अत्यंत आवश्यकता आहे. तेही गलेलठ्ठ नोकरीची. कारण आजच्या परिस्थितीत तुटपुंज्या वेतनात काहीच भागत नाही. म्हणून आपण गलेलठ्ठ वेतनाची नोकरी शोधत असतो. मग अशी नोकरी जिथं मिळेल तिथं आपण जात असतो आणि आपले पोट भरीत असतो. मग त्यात आपला देश का असेना किंवा विदेश का असेना. आपला देश असा की, ज्या देशात माणुसकी आहे. माणुसकी आजही टिकून आहे. आजही आपल्या देशानं माणुसकी सोडलेली नसून आजही आपल्या देशातील लोकं आबालवृद्धांची सेवा करतात. त्यातच मायबापाचीही सेवा करतात. परंतू काही काही महाभाग आजही असे आहेत की, जे मायबापांच्या पोटातून जन्म घेतात. त्यांचे उपकार घेतात. लहानाचे मोठे होतात. प्रसंगी सरकारी नोकरीवर लागतात. परंतु ते उपकार विसरतात व त्या उपकारावर कोणी काही बोलल्यास त्याला अपशब्द बोलतात वा अपमान करतात. आज बरेच असे महाभाग आहेत की, जे सरकारी नोकरीवर मोठ्या पदावर आहेत. ते मोठ्या पदावर मायबापामुळंच गेलेले असून ते उपकार विसरल्याचे निदर्शनास येत आहे. जेव्हा त्यांचे मायबाप म्हातारे झाले, तेव्हा अशा बऱ्याच जणांनी माणुसकी विकून आपल्या मायबापाला वृद्धाश्रमात टाकलेले आहे. हे वृद्धाश्रमातील भेटीदरम्यान दिसून येते. याबाबत एक प्रसंग सांगतो.

प्रसंग असा, यावेळेस अक्षयतृतीयाचा पर्व पार पडला. त्यात एक पोस्ट आली. कशाला आज मायबापांना पुजताय? म थितार्थ असा मायबाप जीवंत होते तेव्हा ज्यांनी सेवा केली नाही. त्यांना मायबापाचे पुजन करण्याचा अधिकार नाही. वास्तविक ही पोस्ट बरोबर होती. ज्यांनी मायबापाची सेवाच केली नाही आपल्या संबंध आयुष्यात, त्यांना सेवेचा अधिकार कशाला? परंतु या पोस्टवर अनेक प्रतिक्रिया आल्या. त्यात कशाला अशा पोस्ट करताय? असाच हेतू होता साऱ्या लोकांचा. बहुतेक तो नोकरीवर असलेल्यांचाच ग्रुप असावा. ज्यांचे मायबाप त्यांच्याजवळ नसावे आणि ज्यांनी आपल्या नोकरीसाठी आपल्याच मायबापांना वृद्धाश्रमात टाकलेलं असावं. होय नोकरी करणाऱ्या मंडळींची हीच गत आहे. जिथं नोकरी करणारी मंडळी आपल्या मुलांनाच दाईकडं सोपवून त्या नोकरीवर जातात. तिथं ती दाई आपल्या मुलांसोबत कसला व्यवहार करते याकडेही ही मंडळी ढुंकून पाहात नाही. ती काय मायबापांना सांभाळणार उतार वयात.

याबाबत एक बहात्तर वर्षाचा व्यक्तीला विचारलं, काका, आपली मुलं दिसत नाहीत. कुठं आहेत? त्यावर तो दुःखी अंतःकरणानं म्हणाला, मी विनाकारणच शिकवलं माझ्या मुलाला. माझी दोन्ही मुलं आज विदेशात स्थायीक झालेली आहेत. ते इथं येत नाहीत. जास्त पैसा कमवतात ना. त्यावर मी पुन्हा म्हटलं, तुम्ही त्यांच्याकडे का राहात नाही? पोषत नाहीत का ते? त्यावर ते म्हणाले, पोषतात. परंतु आम्हास तिथं करमत नाही. आजारी पडतो आम्ही. तेथील वातावरण आम्हाला लाभदायक होत नाही. मग कशाला ओझं व्हायचं मुलांवर? मला वाटतं की मी फालतूच शिकवली मुलं. नसती शिकवली तर ती मुलं आजही माझ्याजवळच राहिली असती. म्हातारपण मोठं भारी. म्हाताऱ्यांची ही कैफियत. बरीच अशी म्हातारी मंडळी मिळतात आणि आपल्या आटलेल्या वेदना सांगत असतात. याबाबत अनेक किस्सेही प्रसिद्ध आहेत. एका शेतकऱ्यांची गोष्ट सांगतो. या शेतकऱ्यानं आपल्या मुलाला शिकवलं. तो मोठा ऑफिसर बनला. त्यानंतर मुलगा ऑफिसर बनताच त्याचा शेतकरी बाप त्याला भेटायला गेला. जेव्हा तो भेटायला गेला. तेव्हा भेटीदरम्यान तिथं सभा चाललेली होती. विचारलं, 'कोण हे?' उत्तर मिळालं, 'माझ्या घरचा नोकर.'

आज मुलांनी असला व्यवहार करु नये मायबापासोबत. ते होते म्हणून आपल्याला जग पाहता आलं. ते तेवढंच सत्य आहे. त्यांनी आपल्या रक्ताचं पाणी करुन शिकवलं आपल्याला आणि आपण आज ते रक्तच विसरलो तर आपल्या जगण्याला काहीच अर्थ उरत नाही. तसंच त्यांची सेवा न करता आपण देवधर्म कितीही पुजले तरी ते पुण्य ठरत नाही. मायबापाची सेवा हीच इश्वरसेवा आहे. ते होते म्हणून आपल्या देव कळला. देवाचा आकार कळला. ते जर नसते तर आपला जन्मही झाला नसता, आपल्याला देवही कळला नसता व देवाचा आकारही. बरेचशी अशी लेकरं आहेत की, मायबाप जीवंत असतात, तेव्हा किंचीतही सेवा करीत नाहीत आणि ते नसल्यावर त्यांची सोनेरी रंगात भव्यदिव्य फोटो बनवतात. अशी फोटो बनवतात की जी सुबक व सुंदर असते. सारखी पाहाविशी वाटते. तसेच ते महाभाग आपल्या मायबापाला आपल्या मायबापाची सेवा न करता ते मरण पावल्यावर त्यांची दरवर्षी नित्यनेमानं पितृमोक्ष अमावस्या व अक्षयतृतीयेला पूजा करीत असतात. खरंच याला काय म्हणावे? दिखाऊपणा की आत्मीयता. याबाबत काही बोलल्यास नक्कीच राग येतो अशा उभययंतांना. हा दिखावाच असतो. त्यात आत्मीयता नसतेच. लोकांनी आपल्याला नावबोटं ठेवू नये म्हणून. म्हणतात की ती प्रथा आहे. मग मायबापाची सेवा करणं ही प्रथा नाही का? काही काही मायबाप तर मायबापाच्या मृत्यूनंतर भिंतीवर त्यांची आठवण म्हणून फोटोही लावत नाहीत.

महत्वाचं म्हणजे काही काही लोकं असेही असतात की, जे आपल्या स्वतःच्या मायबापाची सेवा करीत नाहीत. परंतु इतरांची जास्त सेवा करतात. परंतु कोणाची वा इतरांची सेवा नाही केली एकदाची तरी चालेल, ज्यानं जन्म दिला त्या मायबापाची सेवा करावी. त्यांच्या सेवेनच सातजन्माचं पुण्य लाभतं. जो सेवा करेल, तो मेवा खाईल या वृत्तीप्रमाणे ती सेवा केल्यास असं पुण्य लाभतं की, त्या पुण्यातून आपण सदैव सुखी होतो. आपलं आयुष्यही सुखदायक होतं आणि आपल्याला आजार-पाजार होत नाहीत. पर्यायानं सांगायचं झाल्यास आपण आपलं व आपल्या मुलाबाळाचं आयुष्य त्या पुण्यानं मंगलमय बनवू शकतो हे तेवढंच खरं आहे.

**-अंकुश शिंगाडे**
नागपूर
मो. ९३७३३५९४५०

# लोकसंख्या शिक्षण काळाची गरज

जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या देशात भारताने चीनला मागील वर्षीच मागे सारून अव्वल स्थान प्राप्त केले. तज्ज्ञांनी २०२३ साली भारत चीनला मागे सारून सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश बनेल असा अंदाज वर्तवला होता. युनायटेड नेशन्स पॉप्युलेशन फ्रंट या जागतिक लोकसंख्येचा अभ्यास करणाऱ्या संयुक्त राष्ट्र संघाच्या संस्थेने त्याची पुष्टी केली होती. युनायटेड नेशन्स पॉप्युलेशन फ्रंटने आता जाहिर केलेल्या आकडेवारीनुसार आजभारताची लोकसंख्या १४४ कोटींच्या घरात पोहचली आहे.

मागील वर्षी भारताची लोकसंख्या १,४२८.६ दशलक्ष आहे तर चीनची लोकसंख्या १,४२५.७ दशलक्ष इतकी आहे म्हणजेच दोन्ही देशांच्या लोकसंख्येमध्ये २.९ दशलक्ष इतका फरक आहे. अवघ्या एका वर्षात भारताची लोकसंख्या २ कोटींनी वाढली आहे. चीनच्या लोकसंख्या वाढीचा वेग घटत आहे तर भारताचा लोकसंख्या वाढीचा वेग वाढत आहे. हाच वेग कायम राहिला तर लवकरच भारताची लोकसंख्या दीडशे कोटी होईल.

आज भारताची लोकसंख्या १४४ कोटींच्या पुढे गेली आहे.



देश स्वातंत्र्य झाला तेंव्हा आपली लोकसंख्या तीस कोटी होती याचाच अर्थ मागील पंच्याहत्तर वर्षात आपल्या देशातील लोकसंख्या ११४ कोटींनी वाढली. आज आपण लोकसंख्येत जगात पहिल्या क्रमांकावर पोहचलो आहोत अर्थात ही काही भूषणावह बाब नाही. देशाच्या सर्व समस्यांचे मूळ हे वाढत्या लोकसंख्येतच आहे. झपाट्याने वाढणाऱ्या लोकसंख्येमुळे देशात अन्न, वस्त्र, निवारा, रोगराई आणि दारिद्रय असे अनेक प्रश्न उदभवू लागले आहेत. विशेष म्हणजे देशाच्या प्रगतीत वाढती लोकसंख्या ही मोठा अडसर ठरत आहे. लोकसंख्या वाढीचा सर्व बाबींवर परिणाम होत असून विकासालाही खीळ बसत आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे देशातील सर्व नागरिकांच्या मूलभूत गरजा भागवणेही सरकारला शक्य होत नाही. ही लोकसंख्या आटोक्यात आणण्यासाठी शासनस्तरावरून पुरेसे प्रयत्नही केले जात आहेत. पण समाजातून अजूनही त्या प्रयत्नांना म्हणावी तशी साथ मिळत नाही.

कुटुंब नियोजनाची मोहीम सरकारी पातळीवर प्रभावीपणे राबवली जात आहे ही दिलासा देणारी बाब असली तरी मुलगा व्हावा या हट्टापायी तीन ते चार अपत्यांना जन्म देणारे महाभागही समाजात आहेत. या आणि अशा लोकांमुळेच ही मोहीम वेग धरत नाही. लोकसंख्या नियंत्रणात आणायची असेल तर नव्या पिडीमध्ये लोकसंख्येविषयी योग्य दृष्टिकोन आणि जाणीव निर्माण करण्याची आवश्यकता आहे त्यासाठी नव्या पीडिला लोकसंख्या शिक्षण दिले पाहिजे. अवघ्या २४ वर्षात जगाची लोकसंख्या पाच अब्जानी वाढली तर देशाची लोकसंख्या पंच्याहत्तर वर्षात ११० कोटींनी वाढली या वेगाने जर लोकसंख्या वाढत राहिली तर लोकसंख्येचा हा भार वसुंधरा पेलू शकणार नाही त्याचा परिणाम एकूणच मानवी जीवनावर काय होईल हे नव्या पिढीला समजावून सांगावे लागेल.

देशातील लोकसंख्या जर नियंत्रणात आली नाही तर सर्वानाच अडचणींचा सामना करावा लागेल. आपण जागतिक महासत्ता बनण्याचे स्वप्न पाहत आहोत. हे स्वप्न साकार करायचे असेल तर वाढत्या लोकसंख्येला आळा घालावाच लागेल हे नवीन पिढीला पटवून द्यावे लागेल. वाढत्या लोकसंख्येमुळे होणारे दुष्परिणाम, निर्माण होणाऱ्या समस्या याची विद्यार्थ्यांना माहिती व्हावी यासाठी शाळा, महाविद्यालयांमध्ये चर्चासत्रांचे आयोजन करून विद्यार्थ्यांचे प्रबोधन करायला हवे. लोकसंख्या शिक्षण अप्रत्यक्ष सामाजिक शिक्षण आहे. त्यामुळे केवळ तरुणांनाच नव्हे तर समाजालाही या शिक्षणाची गरज आहे. लोकसंख्या शिक्षण ही काळाची गरज आहे. लोकसंख्या वाढ रोखायची असेल, देशाला विकासाच्या मार्गावर न्यायचे असेल आणि देशाला महासत्ता बनवायचे असेल तर लोकसंख्या शिक्षणाला पर्याय नाही.

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
९९२२५४६२९५

## थोडक्यात...

### आज पुरुषोत्तम महाराज बुलढाणेकर यांचे कीर्तन



**लोहा (प्रतिनिधी)–** लोहा येथील उद्योजक ज्ञानेश्वर पाटील पवार यांच्या नांदेड रोडवरील जिजामाता व्यापारी संकुलाचे दि. २९ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता उद्घाटन सोहळा आयोजित करण्यात आला आहे. कु.शाश्वी सागर पवार हिच्या द्वितीय वाढदिवसानिमित्त प्रसिद्ध किर्तनकार हभप पुरुषोत्तम महाराज पाटील बुलढाणेकर यांच्या हरि किर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे. माजी आमदार रोहिदास चव्हाण, आमदार आनंदराव पाटील बोंढारकर, माजी आमदार शंकर अण्णा धोंडगे, सामाजिक कार्यकर्त्या सौ. आशाताई श्यामसुंदर शिंदे, अहमदपूर बाजार समितीचे सभापती मंचकराव पाटील आदींची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या कार्यक्रमांना जिल्ह्यातील सर्वांनी उपस्थित राहावे, असे आवाहन सागर ज्ञानेश्वर पाटील पवार, सुमित ज्ञानेश्वर पाटील पवार यांनी केले आहे.

### हडको भागात ७० हजारांची घरफोडी

**नांदेड (प्रतिनिधी)–** हडको परिसरातील राम मंदिरजवळ घर फोडून अज्ञात चोरट्यांनी सोन्याच्या अंगठीसह ७० हजारांचा ऐवज व बडोदा बँकेचे चेकबुक चोरून नेले आहे. ही घटना २४ एप्रिल रोजी सायंकाळच्या सुमारास घडली. सचिन अवधूतराव लांडगे यांच्या फिर्यादीवरून नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस हवालदार गुट्टे करत आहेत.

# परोटी तांडा येथे वसंतराव नाईक यांच्या पुतळ्याचे राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांच्या हस्ते भूमिपूजन





**किनवट (प्रतिनिधी)** – राज्याचे माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांच्या पुतळ्याचा भुमिपूजन समारंभ कार्यक्रम किनवट तालुक्यातील परोटीतांडा येथे राज्याचे उद्योग, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), उच्च व तंत्र शिक्षण, आदिवासी विकास, पर्यटन, मृद व जलसंधारण राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांच्या हस्ते सोमवारी करण्यात आला.

यावेळी आमदार भीमराव केराम, आमदार बाबुराव कोहळीकर, श्रीमती बेबीताई प्रदीप नाईक, प्रफुल राठोड, डॉ. बेलखोडे, तहसीलदार श्रीमती शारदा चोंडेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी परोटी तांडा व परिसरातील समस्या लवकरात लवकर सोडवण्याचे आश्वासन राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी दिले.

परोटीतांडा येथील शाळेच्या मैदानावर राज्यमंत्री नाईक यांचा नागरी सत्कार करण्यात आला. आमदार केराम, आमदार कोहळीकर, श्रीमती नाईक यांनी नागरिकांच्या विविध समस्या सोडण्याबाबत विचार मांडले. प्रास्ताविक नारायण आडे यांनी केले. शेवटी आभार डॉ. मेरसिंग चव्हाण यांनी मानले.

सर्वप्रथम राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी सहस्त्रकुंड येथील महादेव मंदिराचे दर्शन घेऊन ट्रस्ट व ग्रामपंचायत वाळकीच्यावतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास परिसरातील सरपंच, उपसरपंच, नाईक, कार्यकर्ते यासह समाजातील नागरिकांची उपस्थिती होती.

## दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रियांची कार्यशाळा संपन्न



**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड स्त्रीरोग संघटना व डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने नांदेडमध्ये प्रथमच एकदिवसीय दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रियाची कार्यशाळा दि. २७ एप्रिल रोजी डॉ. शंकरराव चव्हाण वैद्यकीय महाविद्यालय, विष्णुपुरी येथे संपन्न झाली. या कार्यशाळेमध्ये १५० हून अधिक डॉक्टरांनी सहभाग नोंदवला.

या कार्यशाळेमध्ये विविध प्रकारच्या १६ शस्त्रक्रिया दुर्बिणीद्वारे करण्यात आल्या. मुंबई, अहिल्यानगर व अकोला येथून आलेले निष्णात लॅपरोक्सोपीक सर्जन डॉ. नितीन शहा, डॉ. ऋषिकेश पंडित, डॉ. राहुल लाखे यांनी शस्त्रक्रिया केल्या.

या कार्यशाळेचे उद्घाटन अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पी.टी. जमदाडे, डॉ. एस. आर. वाकोडे, डॉ. कुलकर्णी, डॉ. शिरीष दुलेवाड, डॉ. फसिहा तसनीम उपस्थित होत्या. याप्रसंगी मेघश्री गिरीश देशमुख कहाळेकर, डॉ. सुनिता तांदुळवाडकर,डॉ. कल्याण बरमदे व डॉ. शेजल नाईक इगल प्रोजेक्टची माहिती दिली.

या प्रोजेक्टमध्ये प्रत्येक स्त्रीरोगतज्ज्ञ आणि विद्यार्थ्यांनी लॅपरोक्सोपीच्या तंत्रज्ञानाची माहिती घ्यावी व या आधुनिक तंत्रज्ञानाचा फायदा याचे महत्त्व विशद केले.

याप्रसंगी संस्थेच्या उपाध्यक्षा डॉ. मीनल पाटील, सचिव डॉ. प्रांजली जोशी, कोषाध्यक्षा डॉ. शुभांगी पवार ह्या उपस्थित होत्या. तसेच डॉ. शिरीष दुलेवाड, डॉ. मंगेश नरवाडकर यांनी दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रियेच्या लाईव्ह प्रदर्शनाच्या कामामध्ये योगदान दिले. सूत्रसंचालन डॉ. शिप्रा कट्टे, डॉ. शीतल कुरूंदकर व डॉ. वैदही चिद्रवार यांनी केले. डॉ. स्मिता चिद्रावार यांनी आभार मानले.

## उद्योग राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांची हिमायतनगर येथे भेट



**हिमायतनगर (प्रतिनिधी)** – किनवट तालुक्यातील परोटीतांडा येथे स्वर्गीय माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या पुतळ्याचा भुमिपूजन सोहळा व नागरी सत्कार समारंभासाठी जात असतांना राज्याचे उद्योग, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), उच्च व तंत्र शिक्षण, आदिवासी विकास, पर्यटन, मृद व जलसंधारण राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी हिमायतनगर येथील जाज्वल्य देवस्थान श्री परमेश्वर मंदिरास सोमवारी दि. २८ रोजी दुपारी १२ वाजता भेट दिली.

यावेळी परमेश्वर मंदिर कमिटीच्या वतीने मंदिराचे उपाध्यक्ष महाविरचंद श्रीश्रीमाळ यांच्या हस्ते श्रीची प्रतिमा, देऊन स्वागत सत्कार करण्यात आला. याप्रसंगी मंदिर कमेटीचे सेक्रेटरी अनंतराव देवकते, संचालक अनिल मादसवार, संजय माने, विलास वानखेडे, भाजपा तालुकाध्यक्ष गजानन चायल, रामभाऊ सूर्यवंशी, शुद्धोधन हनवते, ज्ञानेश्वर पंदलवाड, रवी राठोड, बालाजी पाटील, यासह अनेकजन उपस्थित होते.

## सब ज्युनिअर नेटबॉल स्पर्धेसाठी जिल्हा निवड चाचणी

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड जिल्हा नेटबॉल असोसिएशनच्या वतीने जिल्हा सबज्युनियर निवड चाचणीचे आयोजन दि. ३० एप्रिल रोजी महात्मा कबीर विद्यालय, सहयोग नगर येथे सकाळी ६ आणि दुपारी ४.३० वाजता होणार आहे. वय १६ वर्षाखालील खेळाडू या जिल्हा निवड चाचणी स्पर्धेमध्ये भाग घेऊ शकतात. सदर निवड चाचणी स्पर्धेतून मे महिन्यात होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी होणाऱ्या राज्य निवड चाचणीकरिता उत्कृष्ट खेळाडूचे जिल्ह्यातून निवड करण्यात येईल. खेळाडूंनी अधिक माहितीसाठी प्रशिक्षक सुमेध गायकवाड (८८३०२८१४९७) यांच्याशी संपर्क करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## खूनातील फरार आरोपी एलसीबीच्या जाळ्यात



**नांदेड (प्रतिनिधी)** – सावरगाव माळ (ता. भोकर) येथे पत्नीचा दगडाने ठेचून खून करणाऱ्या फरार पतीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली आहे. त्याला भोकर पोलिसांच्या स्वाधीन केले असून पुढील तपास भोकर पोलीस करत आहेत.

सावरगाव माळ (ता. भोकर) येथील सुरेखा मरोती टिकेकर (वय ३८, रा. सावरगाव माळ ता. भोकर जि. नांदेड) ही गायब झाल्याची तक्रार पोलीस ठाण्यात दिली होती.

सदर मिळालेल्या मानवी अवयवांवरुन यातील महिलेची ओळख पटविणे पोलीसांसाठी कसोटीचे काम होते. पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांच्या मार्गदर्शनावरुन पोलीस उपनिरीक्षक साईनाथ पुयड व त्यांचे सहकारी विलास कदम, किसन मुळे, विश्वनाथ इंगळे, बालाजी कदम, संदीप घोगरे, गणेश धुमाळ, हेमंत बिचकेवार, सायबरचे राजेंद्र सिटीकर या पथकाने आरोपी नामे मारोती माधव टिकेकर (वय ४० वर्षे रा. सावरगाव माळ ता. भोकर जि. नांदेड) यास अटक केली. त्यास पुढील कार्यवाहीसाठी भोकर पोलीस ठाण्याच्या स्वाधीन करण्यात आले.

या गुन्ह्याचा तपास लावल्याबद्दल पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार आणि उदय खंडेराय यांनी यांनी पोलीस उप निरीक्षक साईनाथ पुयड व पथकाचे कौतुक केले आहे.

## व्यंकटराव खानसोळे यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)–** लोहा तालुक्यातील टाकळगांव येथील वयोवृद्ध, ज्येष्ठ नागरिक व्यंकटराव रेशमाजी खानसोळे (वय ६५ वर्षे) यांचे दि. २८ एप्रिल रोजी सकाळी ११ च्या दरम्यान वृद्धापकाळाने निधन झाले.

त्यांच्या पार्थिवावर मंगळवारी दि. २९ एप्रिल रोज सकाळी ११ वाजता टाकळगांव येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात चार भाऊ, एक मुलगी, दोन मुले, सुना, नातू पणतू असा मोठा परिवार आहे. मारोती व्यंकटराव खानसोळे व चक्रधर व्यंकटराव खानसोळे यांचे ते वडील होत.

## शांताबाई ज्ञानोबा हनमंते यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)** – जयभीमनगर येथील ज्येष्ठ महिला शांताबाई ज्ञानोबा हनमंते (बेंद्रीकर) यांचे वयाच्या ७२ व्या वर्षी दि. २५ एप्रिल रोजी रात्री १० वाजेच्या सुमारास अल्पशः आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात्त पती, तीन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्यावर दि. २६ एप्रिल रोजी दुपारी नांदेड येथील शांतीधाम स्मशानभूमी गोवर्धनघाट येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

## मुदखेड शहरात भिम जयंती उत्साहात साजरी



**मुदखेड (प्रतिनिधी)** – डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची दि. २७ एप्रिल रोजी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नियोजित पुतळ्याच्या मैदानावर आमदार श्रीजया चव्हाण यांच्या हस्ते खिचडीचे वाटप करण्यात आले.

प्रारंभी आमदार श्रीजया अशोकराव चव्हाण यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर विविध राजकीय पक्षांच्या वतीने पुष्पहार अर्पण अभिवादन करण्यात आले. काँग्रेसचे तालुका अध्यक्ष प्रताप देशमुख, शहराध्यक्ष कैलास गोडसे यांनीही अभिवादन केले.

शहरातील भीमनगर, अशोकानगर, लिंबोनीनगर, नवी आबादी, सतानगर व इतर भागातून शांततेत मिरवणूक काढण्यात आली.

यावेळी प्रवीण गायकवाड, रामसिंग चव्हाण, रावसाहेब चौदंते, ईश्वर पिन्नलवार, कुणाल चौदंते, नितीन चौदंते, मधूकर दौवने, अबु गुडमलवार, राजू झगडे, पप्पू सोनटक्के, संतोष गाढे, साजन जोंधळे, अरुण चौदंते, रवी चौदंते, सिद्धार्थ चौदंते यांनी खिचडी वाटप केली.

महात्मा फुले चौकात ऑटो संघटनेच्यावतीने दोन क्विंटल खिचडी वाटप करण्यात आली. या प्रसंगी प्रियतम् चौदंते, कोंडोपंत चौदंते, देवराव चौदंते, संजय चौदंते, शिवानंद देवके, रविंद्र चौदंते, मारोती चौदंते, सुभाष चौदंते, सोमदत चौदंते, विशाल कापसे, विनोद कांबळे, रवींद्र कांबळे, संजय लोखंडे, लारा चोदंते, दिगंबर कदम, दीपक भक्ते, गोतम थोरात, प्रकाश चोदंते, संजय सरवदे, देवानंद चौदंते यांच्या वतीने खिचडी वाटप करण्यात आली.

शहरातील भिमनगर, जूने पोलीस ठाणे ते मठ गल्ली, चौधरी गल्ली, गुजरी मार्ग रेल्वे गेट ते डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नियोजित पुतळ्यापर्यंत मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत मोठ्या संख्येने भीमसैनिक सहभागी झाले होते. पोलीस निरीक्षक वसंत सप्रे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक बी. आर. कांबळे यांनी शहरात सर्वत्र चोख बंदोबस्त ठेवला होता.

## जिल्हा क्रीडा संकुल उभारणीसाठी ऑलिंपिक संघटनेचे उपोषण सुरु



**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्हा क्रीडा संकुलासाठी आरक्षित केलेली कौठा, असदवन येथील २५ एकर जमीन त्वरित हस्तांतरित करण्यात यावी, या मागणीसाठी नांदेड जिल्हा ऑलिम्पीक संघटना व एकविध क्रीडा संघटनेच्या वतीने बालाजी पाटील जोगदंड व प्रा. जयपाल रेड्डी यांनी सोमवारपासून (दि.२८) आमरण उपोषण सुरू केले आहे.

या उपोषणाला शिवछत्रपती पुरस्कार विजेते जनार्दन गोपिले, अनंत बोबडे, जस्विंदरसिंग रामगडिया, डॉ. राहुल वाघमारे, वृषाली जोगदंड, किशोर पाठक, रामन बैनवाड, डॉ. गजानन कदम, डॉ. विठ्ठल भंडारे, सचिन नरंगले, मनोज जोशी, डॉ दिनकर हंबर्डे, प्रलोभ कुलकर्णी, प्रशांत आसमाने, राष्ट्रीय खेळाडू कन्हैया खांनसोळे, राष्ट्रपाल नरवाडे, संतोष चुनोडे, सुभाष कुरे, मुझेफ शेख, धोंडीबा चिकटवाड, समर्थ सूर्यवंशी, शिव रुद्र उदगीरे, प्रसन्नजीत जाधव, राष्ट्रीय खेळाडू दुर्गेश सूर्यवंशी, आशिष राजपूत, श्रीहरी सातोनकर, दीपक जोगदंड, शशी पारडे, प्रताप राठोड, माधव दुयेवाड, कृष्णा दुयेवाड, विनश्री गडगिळे, किरण नागरे , वैजनाथ नावंदे, विष्णू जगळपुरे, अमोल शेंडगे, कृष्णा गव्हाणे, संतोष मिटकर, अमोल भालेराव, राम जाधव यांनी पाठिंबा दिला आहे.

# महापालिकेत सेवा हक्क दिन साजरा



**नांदेड (प्रतिनिधी)** – दि.२८ एप्रिल रोजी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम-२०१५ च्या अंमबलबजावणीला दि. २८ एप्रिल रोजी दहा वर्ष पूर्ण होत आहे. त्यामुळे महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार हा दिवस महानगरपालिकेत सेवा हक्क दिन म्हणून साजरा करण्यात आला.

याप्रसंगी मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांच्या हस्ते सेवा हक्क प्रतिज्ञेचे वाचन करण्यात आले.

दरम्यान मनपाच्या शिक्षण विभागा मार्फत लोक सेवा हक्क दिनाचे महत्व पटवुन देण्यासाठी पथनाट्याचे सादरणीकरण करण्यात आले. यावेळी अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम यांच्यासह उपआयुक्त अजितपालसिंघ संधु, सहाय्यक संचालक नगररचनाकार पवन आलुलकर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी डॉ.जनार्दन पक्कान्ने, लेखाधिकारी श्रीनिवास चन्नावार, सहाय्यक आयुक्त मो. गुलाम सादेक, सिस्टिम मॅनेजर सदाशिव पतंगे, उपअभियंता संघरत्न सोनसळे, क्षेत्रिय अधिकारी रावण सोनसळे, गौतम कवडे, निलावती डावरे, अग्निशमन अधिकारी के. जी. दासरे व अधिकारी व कर्मचाऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## कुंडलवाडी पोलिसांकडून पाच महिन्यांनंतर गुन्हा उघडकीस, चोरट्यास अटक

### इतर दोन साथीदारांचा कसून तपास

**कुंडलवाडी (प्रतिनिधी)–** कुंडलवाडी पोलिसांना चोरीचा गुन्हा उघडकीस आणला आहे. दुचाकीवरून दोन लाख ७० हजार रुपये लांबविणाऱ्या आरोपीस उमरी रेल्वे स्टेशन परिसरातून अटक केली आहे.

दौलापूर येथील शेतकरी आत्माराम गंगाराम देगावे (वय ४५) यांचे २२ नोव्हेंबर २०२४ रोजी कुंडलवाडी ते धर्माबाद रोडवर चोरट्यांनी दुचाकीवर पाठलाग करून दोन लाख ७० हजार रुपये लुटले होते.

कुंडलवाडी पोलीस आणि स्थानिक गुन्हे शाखेने या गुन्ह्याचा तपास लावला आहे. सीसीटीव्ही फुटेज व डम्पडाटा आधारे पोलीस आरोपी हा शेख आफताफ शेख अहेमद वय (५२, सध्या रा. सोमठाणा ता. उमरी) मुळगांव रा. कळंबा जि. कोल्हापुर याला उमरी रेल्वेस्टेशन परिसरातून अटक करण्यात आली.

पोलीस स्टेशन कुंडलवाडी येथील पथक स.पो.नि ज्ञानेश्वर शिंदे, पो.उप.नि गजेंद्र मांजरमकर, पोकॉ अमर शिंदे यांनी सखोल तपास केला. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकातील पोउपनि महेश कोरे, स.पो.उप.नि.माधव केंद्रे, पोहेकॉ कांबळे, पोहेकॉ लोसरवार, पोकॉ यादगिरवाड, चालक पोकॉ घेवारे यांनी आरोपीचा शोध घेतला.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानात प्रत्येक नागरिकाला आत्मसन्मान दिला –बबनराव बारसे



**नांदेड (प्रतिनिधी)–** भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानात समता, स्वातंत्र्य, बंधुता तत्वाला महत्त्व दिले आहे. त्यांनी आपल्या ज्ञानाचा बळावर संपूर्ण जगात आपला ठसा निर्माण केला. करोडो भारतीयांचा श्वास म्हणजे बाबासाहेब आंबेडकर आहेत. त्यांनी प्रत्येक नागरिकाला आत्मसन्मान दिला, असे प्रतिपादन उद्धव ठाकरे गटाचे शिवसेना जिल्हाप्रमुख बबनराव बारसे यांनी केले.

बारसगाव (ता. अर्धापूर) येथे सोमवारी दि.२८ एप्रिल रोजी आयोजित करण्यात आलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमात ते बोलत होते.

तालुक्यातील बारसगाव येथे भीमजयंती मंडळाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम घेण्यात आले. बौद्ध विहारात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. शिवसेना जिल्हाप्रमुख बबनराव बारसे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी अमोल बारसे, बंटी मोरे, पोलीस पाटील सुनील मोरे, बाबाराव बारसे, ग्रा.पं. सदस्य नामदेव ताटे, साईनाथ बारसे, सहशिक्षिका सिमा नरवाडे, अनिता तोतरे, पवार आदी उपस्थित होते. यावेळी पंचशील, त्रिशरण पठण करण्यात आले. गावातील प्रमुख मार्गावरून मिरवणूक काढण्यात आली. कार्यक्रमासाठी जयंती मंडळाचे अध्यक्ष तुकाराम वाघमारे, उपाध्यक्ष माधव मोरे, श्यामराव वाघमारे, आनंद मोरे यांनी पुढाकार घेतला. हिरमन मोरे यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

स्मार्ट शेतकरी, स्मार्ट शेती

# शिवार



# खरीप भाजीपाला लागवडीची पूर्वतयारी

**रोपवाटिका तयार करताना योग्य जागेची निवड खूप महत्त्वाची बाब आहे. रोपवाटिकेची जागा पृष्ठभागापासून उंचावर, पाण्याचा योग्य निचरा होणारी, उन्हाच्या झळांपासून संरक्षणासाठी अंशतः सावली देणारी अशी असावी. निवडलेली जागा सिंचन स्रोतापासून जवळ असावी.**

खरीप हंगामात भाजीपाला लागवडीचे योग्य नियोजन करून पूर्वतयारी करणे आवश्यक आहे. भाजीपाला लागवडीमध्ये पूर्वमशागत, सेंद्रिय खतांचा वापर, पीक निवड, सिंचन व्यवस्थापन, कीड व रोगनियंत्रण आदी बाबी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. तसेच लागवडीपूर्वी माती परीक्षण करणे आवश्यक आहे. त्यामुळे जमिनीतील उपलब्ध अन्नद्रव्यांची माहिती मिळून आवश्यकतेनुसार खतांचा पुरवठा करता येतो. भाजीपाला पिकांच्या शाश्वत उत्पादनासाठी खत व्यवस्थापनावर विशेष भर द्यावा. जमिनीच्या मगदुराप्रमाणे योग्य भाजीपाला पिकाची निवड करावी. वेगवेगळ्या भाजीपाला पिकांची पाण्याची गरज ही कमी जास्त असते. पर्जन्यमान आणि उपलब्ध सिंचन व्यवस्थापन आदी बाबी विचारात घ्याव्यात.

## पूर्वमशागतीचे नियोजन

खरीप हंगामात भाजीपाला लागवडीसाठी पूर्वमशागतींच्या कामांचे योग्य नियोजन आवश्यक आहे. जमिनीची खोल नांगरणी करून उभी आडवी वखरणी करावी. नांगरटीनंतर जमीन दोन ते तीन दिवस उन्हात चांगली तापू द्यावी. जेणेकरून मातीतील कीड-रोगांच्या अवस्था नष्ट होतील. जमिनीचा उतार लक्षात घेऊन उताराला आडवी मशागत करावी. यामुळे जमिनीची धूप कमी होते. आणि सिंचनाचे योग्य नियोजन करणे शक्य होते. शेवटच्या वखरणीपूर्वी हेक्टरी २० ते २५ बैलगाड्या चांगले कुजलेले शेणखत किंवा गांडूळ खत शेतामध्ये पसरून घ्यावे.





## लागवड पद्धती

- सपाट किंवा बंदिस्त वाफे : रिजरच्या साह्याने उभे व आडवे वाफे तयार करावेत. वरंब्याची उंची २५ ते ३० सेंमी ठेवावी. सपाट किंवा बंदिस्त वाफ्यांमुळे पावसाचे पाणी जागेवरच जमिनीत मुरले जाते. तसेच जमिनीत ५० टक्के जास्त ओलावा धरून ठेवण्यास मदत होते.
- सरी वरंबा : मध्यम ते भारी जमिनीत लोखंडी नांगराने उतारास आडवे तास मारावेत. भाजीपाला पिकांच्या लागवड पद्धतीचा विचार करून ट्रॅक्टरच्या साह्याने सऱ्या पाडून घ्याव्यात. ट्रॅक्टरच्या साह्याने जमिनीत सऱ्या पाडून घ्याव्यात. भाजीपाला पिकाच्या निवडीनुसार लागवड अंतर विचारात घेऊन सऱ्या पाडाव्यात. या पद्धतीमुळे लागवडीच्या कमी जास्त अंतरानुसार भाजीपाला पिकात ३० ते ३५ टक्के उत्पादनात वाढ होते. कोरडवाहू व चोपण जमिनीत पाणी मुरविण्यासाठी व जमिनीत विद्राव्य क्षाराचे प्रमाण कमी करण्यासाठी बंदिस्त सरी वरंबा पद्धत फायद्याची ठरते.

### समपातळीत मशागत

खरीप हंगामात अधिक पाऊस असलेल्या क्षेत्रात समपातळीत मशागत केल्याने जमिनीत पाणी मुरण्यास मदत होते. त्यासाठी जमिनीची सपाटीकरण, नांगरणी, कुळवणी यासारख्या मशागती समपातळीत करून घ्याव्यात.

## रोपवाटिका तयारी

- रोपवाटिका तयार करताना जागेची निवड खूप महत्त्वाची बाब आहे. रोपवाटिकेकरीता हराळी, लव्हाळा किंवा इतर तण असलेली जमीन निवडू नये.
- रोपवाटिकेची जागा पृष्ठभागापासून उंचावर, पाण्याचा योग्य निचरा होणारी, उन्हाच्या झळांपासून संरक्षणासाठी अंशतः सावली देणारी अशी असावी.
- भाजीपाला पिकांची रोपे लागवडीसाठी ३० ते ३५ दिवसांत तयार होतात. चांगल्या उत्पादनासाठी रोपवाटिकेत रोपांचे संगोपन ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे.
- योग्य जमिनीची निवड केल्यानंतर प्रति गुंठा १ बैलगाडी चांगले कुजलेले शेणखत शेतात पसरून घ्यावे.
- जमिनीची २० ते २५ सेंमी खोल नांगरट करून कुळवाच्या २ ते ३ पाळ्या द्याव्यात.
- जमीन चांगली भुसभुशीत झाल्यानंतर ३ मीटर लांब, मी रुंद, आणि १० सेंमी उंचीचे गादीवाफे तयार करावेत.
- रोपवाटिकेत २ चौ.मीटर जागेला २० ग्रॅम नत्र, १०० ग्रॅम स्फुरद व १० ग्रॅम पालाश द्यावे. त्यापैकी संपूर्ण स्फुरद आणि पालाश आणि अर्धे नत्र बी पेरणीवेळी द्यावे. उर्वरित नत्र २०-२५ दिवसांनी द्यावे.
- वाफा सपाट करून चार बोटांच्या अंतरावर वाफ्यांच्या रुंदीशी समांतर रेषा पाडाव्यात. रेषा जास्त खोल नसाव्यात.
- बी पातळ पेरून हलक्या हाताने लगेच मातीआड करावे.
- बियाण्यांची उगवण होईपर्यंत रोज सकाळी-संध्याकाळी झारीने पाणी द्यावे.
- पेरणी झाल्यानंतर गादीवाफ्यांवर ६० ते १०० मेश नॉयलॉन नेट किंवा मच्छर दाणीसारखे पांढरे कापड २ मीटर उंचीपर्यंत लावावे. त्यामुळे विषाणूजन्य रोगांचा प्रसार करणाऱ्या किडींचा बंदोबस्त होईल.

### बियाणे खरेदी करताना घ्या काळजी

बियाण्यांची खरेदी शक्यतो, खात्रीशीर ठिकाणाहूनच करावी. बियाणे पाकिटावरील लॉट क्रमांक, टॅग क्रमांक आणि इतर मजकूर बरोबर असल्याची खात्री झाल्यानंतर खरेदी करावी. खरेदी केलेली बियाणे पाकिटे पीक उगवण होईपर्यंत जपून ठेवावीत.

# सुधारित तंत्रज्ञानातून वाढवा भुईमूग उत्पादन

**खरीप हंगामातील पावसाचे कमी दिवस, कीड-रोगांचा वाढता प्रादुर्भाव, ढगाळ वातावरण, सूर्यप्रकाशाची कमतरता यामुळे उत्पादनात अस्थिरता दिसून येत असल्याने खरिपातील भुईमुगाचे क्षेत्र कमी होत आहे. सोबतच हेक्टरी रोपांची कमी संख्या, सुधारित वाणांच्या बियाण्यांची कमतरता या व्यवस्थापनातील अडचणीमुळे उत्पादनामध्ये घट होत आहे. हे टाळण्यासाठी सुधारित लागवड तंत्रज्ञानाचा अवलंब करावा.**

- जमीन : मध्यम, चांगल्या निचऱ्याची, मऊ, भुसभुशीत, वाळूमिश्रित, चुना व सेंद्रिय पदार्थ असलेली जमीन योग्य असते. अशा जमिनीत आऱ्या सहज शिरतात व शेंगाही चांगल्या पोसतात. जमिनीचा सामू ६.५ ते ७.५ असावा.
- पूर्वमशागत : भुईमुगाच्या मुळ्या जमिनीत ३० ते ४५ सें.मी. खोल वाढतात. त्यास असंख्य उपमुळे फुटून त्यांचे जाळे जमिनीच्या वरच्या १५ सें.मी. थरात पसरतात. शेंगा पोसण्यासाठी जमिनीत मोकळी हवा राहणे आवश्यक असते. त्यासाठी जमिनीची खोल नांगरणी करावी. चांगले कुजलेले शेणखत किंवा कंपोस्ट खत प्रति हेक्टरी १२ ते १५ गाड्या टाकावे. नांगरणीनंतर कुळवाच्या २ ते ३ पाळ्या देऊन जमीन भुसभुशीत व सपाट करावी.
- बीज प्रक्रिया : पेरणीपूर्व प्रति किलो बियाण्यास ३ ग्रॅम कार्बेन्डाझिम चोळून लावावे. त्यानंतर प्रति किलो बियाण्यास रायझोबियम जिवाणू २५ ग्रॅम चोळावे. त्यानंतर ते पेरणीसाठी वापरावे. बीजप्रक्रियेमुळे उत्पादनात १० ते १५ टक्के वाढ दिसून येते.
- पेरणीची वेळ : भुईमुगाची पेरणी जूनमध्ये पावसाला सुरुवात झाल्यापासून ते जुलैच्या पहिल्या आठवड्यापर्यंत करावी.

## सुधारित जाती

| वाण | प्रकार | कालावधी (दिवस) | उत्पादन (क्विं./हे.) | वैशिष्ट्ये |
|---|---|---|---|---|
| एस.बी.-११ | उपटी | १०५-११० | १४-१६ | कोरडवाहू व बागायती लागवडीसाठी योग्य |
| जे.एल.-२४ | उपटी | ९५-१०० | १६-१८ | कोरडवाहू लागवडीसाठी योग्य |
| एल.जी.एन.-१ | उपटी | १०५-११० | १६-१८ | कोरडवाहू लागवडीसाठी योग्य |
| ए.के.-१५९ | उपटी | १०५-११० | १८-२० | कोरडवाहू लागवडीसाठी योग्य |
| टी.पी.जी.-४१ | उपटी | १२५-१३० | १५-१६ | टपोरे वाण, बागायती लागवडीसाठी योग्य |
| टी.एल.जी.-४५ | उपटी | ११८-१२० | १६-१८ | टपोरे वाण, बागायती लागवडीसाठी योग्य |

## पेरणी करताना...

भुईमुगाची पेरणी पाभरीने अथवा टोकन पद्धतीने करावी. सरी-वरंबा पद्धतीचा वापर करावयाचा असल्यास जमिनीच्या मगदुराप्रमाणे सरी- वरंब्याची उंची व रुंदी ठेवावी. उपट्या जातीसाठी दोन ओळींतील अंतर ३० सें.मी. व रोपातील अंतर १० सें.मी. ठेवावे. त्यासाठी १०० ते १२५ किलो बियाणे वापरल्यास प्रति हेक्टरी ३.३३ लाख रोपांची संख्या मिळते. निमपसऱ्या व पसऱ्या तसेच मोठ्या शेंगदाण्यासाठीच्या वाणांची पेरणी दोन ओळींतील अंतर ४५ सें.मी. व दोन रोपांतील अंतर १५ सें.मी. ठेवून करावी. त्यासाठी हेक्टरी ८० ते १०० किलो बियाणे वापरल्यास प्रति हेक्टरी १.४८ लाख रोपांची संख्या मिळते.

## पाणी व्यवस्थापन

भुईमुगास लागलेल्या एकूण फुलांपैकी फक्त ५-२० टक्केच फुलांचे रुपांतर शेंगामध्ये होते. एकूण लागलेल्या शेंगापैकी ६६ टक्केच शेंगा परिपक्व होतात. उर्वरित ३३ टक्के शेंगा अपरिपक्व राहतात. जास्तीत जास्त परिपक्व शेंगा एकदाच मिळविण्यासाठी झाडास लागणारे पहिले फूल व शेवटचे फूल हा कालावधी कमी असावा.



यासाठी पाणी व्यवस्थापनास अनन्यसाधारण महत्त्व आहे. झाडास पहिले फूल दिसताच (पेरणीनंतर ३० ते ३५ दिवसांनी) पिकास पाण्याचा हलका ताण द्यावा. (५ -६ दिवस पिकास पाणी देऊ नये.) या पाण्याच्या ताणामुळे पिकाची अवास्तव वाढ रोखली जाते. रोगाचा प्रसार कमी होतो. ताणाच्या कालावधीत वनस्पतीत साठलेल्या अन्नाचा वापर फुले निर्मितीसाठी होऊन एकाच वेळी जास्तीत जास्त फुले निर्माण होतात. एकाच वेळी आलेल्या फुलांच्या आऱ्या एकाच वेळी जमिनीत शिरतात. त्यापासून निर्माण शेंगा एकाच कालावधीत परिपक्व होतात. त्या सारख्या आकाराच्या मिळतात. पिकास आऱ्या सुटण्याच्या वेळेस (पेरणीनंतर ४०-४५ दिवसांनी) जमिनीत मुबलक ओलावा असावा. या ओलाव्यामुळे आऱ्या कॅल्शिअमचे शोषण करू शकल्याने शेंगाची वाढ होते. या काळात पाण्याची कमतरता झाल्यास शेंगांमध्ये एका दाण्याचे व अपरिपक्व शेंगांचे प्रमाण वाढते. अशा शेंगाची उगवण शक्ती कमी असते. याउलट पिकास पाण्याचा वापर अति झाल्यास वनस्पतीची शाकीय वाढ जास्त होते, शाकीय वाढ जास्त झाल्यास रोगाचा प्रादुर्भाव बळावतो, नवीन आऱ्या कुजण्याची भीती असते व पिकाच्या असंतुलित वाढीमुळे पिकावर फुले, आऱ्या, कच्च्या शेंगा व परिपक्व शेंगा अशा सर्व अवस्था दिसून येतात. म्हणून पिकात पावसाचे किंवा सिंचनाचे पाणी साचणार नाही याची काळजी घ्यावी. शक्यतो पिकास पाणी तुषार सिंचन पद्धतीने देणे फायद्याचे ठरते.

## आंतरमशागत

पाणी, अन्नघटक, सूर्यप्रकाश व हवा यासाठी मुख्य पिकाशी स्पर्धा करतात. किडी व रोगांना आश्रय देतात. यामुळे उत्पन्नात २५-५० टक्क्यांपर्यंत घट येऊ शकते. भुईमुगात सर्व प्रकारच्या आंतरमशागतीची कामे आऱ्या सुटण्याच्या आत पेरणीनंतर ४५ दिवसांपर्यंत करावीत. पहिल्या दीड महिन्यांत दोन खुरपण्या आणि दोन कोळपण्या करून पीक तणविरहित ठेवावे. शेवटची कोळपणी खोल आणि फासेला दोरी बांधून करावी व यासोबत जिप्सम खत २०० कि./हेक्टर याप्रमाणे पेरावे. तसेच ४० दिवसांनी आणि ५० दिवसांनी २०० लिटर पाण्याचा पत्र्याचा रिकामा ड्रम दोनदा फिरवावा. सुटलेल्या सर्व आऱ्या जमिनीत घुसून भरघोस शेंगा लागतात. अनेक शेतकरी भुईमूग पिकाच्या फांद्यावरील सर्व आऱ्या जमिनीत जाण्यासाठी झाडाला अधिक मातीची भर लावतात. मात्र यामुळे फांद्यांस रोगाच्या बुरशीचा प्रादुर्भाव होऊन सुरवातीस तयार झालेल्या शेंगा खराब होऊ शकतात.



# खरीप पिकांची लागवड करण्यापूर्वी...

**खरीप हंगामात पिकांची लागवड करताना, पाण्याची उपलब्धता, जमिनीचा प्रकार पाहूनच पिकाची निवड करावी. शेतकऱ्यांनी खरीपाची तयारी करताना माती परीक्षण, पूर्व मशागत, पडणाऱ्या पावसाच्या पाण्याचे नियोजन यांचा विचार करूनच खरीपातील पिकांचे नियोजन केले पाहिजे.**

पिकांच्या चांगल्या उत्पादनासाठी जमिनीची सुपीकता महत्त्वाची ठरते. पावसाळ्याच्या आधी खरीपाची लागवड करण्याआधी जमिनीचा पोत माहित असणे गरजेचं आहे. कारण त्यानुसार खतांची मात्रा देणे सोयीस्कर बनते. माती परीक्षण केल्याने जमिनीचा सामू कळून, रिपोर्टनुसार जमिनीतील पिकांना अन्नद्रव्यांची मात्रा देता येते. यासोबतच खतांचा अतिरिक्त वापर कमी होऊन, खर्चातही बचत होते.

## जमिनीची पूर्व मशागत

पिकांची वाढ चांगली होण्यासाठी मुळे खोलवर जमिनीत गेली पाहिजेत. यासाठी दोन ते तीन कुळवाच्या पाळ्या देऊन खोल नांगरणी करून घ्यावी. खोल नांगरट केल्याने किडींची अंडी, कोष



वरच्या थरावर येऊन नष्ट होण्यास मदत होते. शेतातील ज्या जागेमध्ये पाणी जास्त प्रमाणात मुरते. अशा ठिकाणी उताराला आडवे वाफे तयार करून घ्यावेत. खरीप हंगामात वाफे तयार करताना आडवे ६० मीटर अंतरावर उतारास आडवे वाफे तयार करावेत. या वाफ्यांमुळे पाणी वाहून न जाता जागीच मुरण्यास मदत होते. मध्यम ते भारी प्रकारच्या जमिनीत लोखंडी नांगराचा वापर करून उतारास आडवे सऱ्या तयार करून घ्याव्यात. पावसाचे पडणारे पाणी सऱ्यातून जमिनीत मुरते. उताराची लांबी कमी होऊन पाणी जमिनीत मुरते. आपल्याकडे पडणाऱ्या पावसापैकी ८० टक्के पाऊस हा नैऋत्य मान्सून वाऱ्यापासून पडतो. मोसमी पाऊस जमिनीत जिरविण्यासाठी जमिनीच्या उताराला ४ ते ६ इंचाच्या खोल सऱ्या पाडाव्यात.



## गाय आटवताना घ्यायची काळजी

**गाभण जनावरांच्या अवस्थेनुसार आरोग्याच्या दृष्टीने कासेला योग्य आराम मिळणे गरजेचे असते. शास्त्रानुसार गायीला साधारण किमान १०० दिवस आणि म्हशीला किमान १२० ते १५० दिवस आटविणे गरजेचे असते. या काळात गर्भाची ७० टक्के वाढ होत असते. तसेच दूध तयार करणाऱ्या पेशींचे पुर्नजीवन होत असते. गाय आटविताना विशेष काळजी घेणे गरजेचे आहे. कारण अशा काळात गाभण जनावरांवर ताण येऊ शकतो.**



**गाय आटविण्याची पद्धत**

गाय आटवताना शेवटच्या दोन-अडीच महिन्यांमध्ये टप्याटप्याने खुराक कमी करावा. गायीला ओल्या चाऱ्याऐवजी सुक्या चाऱ्याचे प्रमाण वाढवणे गरजेचे आहे. दुधाचे प्रमाण कमी होऊ लागताच दूध काढण्याच्या वेळेतील अंतर वाढवत न्यावे. सुरुवातीला एका वेळेला धार काढावी. दुधाचे प्रमाण कमी होताच एक दिवस आड त्यानंतर तीन दिवस आड दूध काढावे आणि त्यानंतर पूर्ण बंद करावे. शेवटची धार काढताना सड पूर्ण पिळून घ्यावा. पशुवैद्यकीय सल्ल्यानुसार सडामध्ये प्रतिजैविकांची ट्युब सोडावी. गाय आटविताना गोठा आणि गोठ्यातील जमीन कोरडी राहील याची दक्षता घ्यावी. त्याचप्रमाणे सडाला किंवा कासेला जखम झाल्यास दुर्लक्ष करू नये.

# सर्व शासकीय सेवा १५ ऑगस्टपर्यंत ऑनलाईन करा –मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई (प्रतिनिधी)** – महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम अधिकाधिक लोकाभिमुख झाला पाहिजे यासाठी प्रयत्न करावेत. १५ ऑगस्ट २०२५ पर्यंत शासनाच्या सर्व सेवा ऑनलाईन करण्यात याव्यात. शासनाचा जो विभाग १५ ऑगस्टपर्यंत त्यांच्या सेवा ऑनलाईन होणार नाहीत, त्या विभागाला दर दिवशी प्रत्येक सेवेकरिता एक हजार रुपयांचा दंड आकारला जाईल. शासनाकडून कोणत्या सेवा नागरिकांना दिल्या जातात याची शालेय जीवनातच विद्यार्थ्यांना या विषयाबाबत माहिती व्हावी यासाठी या अधिनियमाचा अभ्यासक्रमात समावेश करण्याची कार्यवाही करावी, अशा सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या.

सह्याद्री अतिथीगृह येथे सामान्य प्रशासन विभाग (प्रशासकीय नावीन्यता, उत्कृष्टता व सुशासन) आणि महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र




लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या अंमलबजावणीची ''दशकपूर्ती'' आणि ''प्रथम सेवा हक्क दिन'' निमित्त राज्यस्तरीय सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते.

यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड. आशिष शेलार, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, मुख्य सचिव सुजाता सौनिक, राज्य सेवा हक्क आयोगाचे मुख्य आयुक्त मनु कुमार श्रीवास्तव, आयोगाचे नवनियुक्त ब्रँड ॲम्बेसेडर पद्मश्री शंकर महादेवन, अभिनेत्री सोनाली कुलकर्णी, माजी राज्य सेवा हक्क मुख्य आयुक्त स्वाधीन क्षत्रीय, राज्य सेवा हक्क आयुक्त, कोकण बलदेव सिंह, पुणेचे राज्य सेवा हक्क आयोगाचे आयुक्त दिलीप शिंदे यासह प्रशासनातील ज्येष्ठ वरिष्ठ सनदी अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत सध्या १००० पेक्षा जास्त सेवा या कायद्याच्या अंतर्गत अधिसूचित केल्या आहेत. जवळपास ५८३ सेवा ऑनलाईन दिल्या जात आहेत. अजून ३०६ सेवा या ऑनलाइन आणायच्या आहेत तर १२५ सेवा ऑनलाईन आहेत पण त्या कॉमन पोर्टलवर उपलब्ध नाहीत आणि म्हणून शासनाच्या सर्व विभागांना १५ ऑगस्ट २०२५ पर्यंत सर्व सेवा ऑनलाईन कराव्यात.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जे मूलभूत अधिकार संविधानात समाविष्ट केले, हे मूलभूत अधिकार सर्वांना मिळाले पाहिजेत. १० वर्षात तंत्रज्ञानाच्या गतीमध्ये खूप मोठ्या प्रमाणात फरक पडलेला आहे आणि म्हणून या सेवा अधिक गतिमान पद्धतीने करण्यासाठी आपण प्रयत्न करत आहोत. मंत्रालयात चेहरा पडताळणी ॲपमुळे देखील निम्मी गर्दी कमी झाली आहे. जीवनामध्ये 'इज ऑफ लिव्हिंग' आणण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. शासनाच्या सर्व सेवा व्हॉटसॲपवर तसेच सर्व माहिती संकेतस्थळावर उपलब्ध झाल्यास अनेक तक्रारी कमी होऊन लोकांचे जीवनमान सुसह्य होईल, असेही त्यांनी सांगितले.

## शनिवारपासून आरोग्य विद्यापीठाच्या लेखी परीक्षा

**नाशिक (प्रतिनिधी)** – महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या हिवाळी सत्र-२०२४ व उन्हाळी सत्र-२०२५ च्या लेखी परीक्षेचे संचलन दि. ०३ मे ते १७ मे दरम्यान महाराष्ट्र राज्यातील एकूण ४६ परीक्षा केंद्रावर संचलीत होणार आहे. पदवी, पदव्यूत्तर अभ्यासक्रमांचे खालील परीक्षा संपन्न होणार आहेत.

या परीक्षेत पदवी अभ्याक्रमाच्या तसेच आयुर्वेद, युनानी, होमिओपॅथी पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा घेण्यात येणार आहेत. यामध्ये एकूण अंदाजे २,७२२ विद्यार्थी संपूर्ण महाराष्ट्रातून प्रविष्ठ होणार आहे. प्रश्नपत्रिका ऑनलाईन पद्धतीने पाठविण्यात येणार आहे. परीक्षा संपल्यानंतर उत्तरपत्रिकांचे त्याच दिवशी संबंधीत परीक्षा केंद्रांवर स्कॅनिंग करुन केंद्रीय मुल्यांकन केंद्रांवर ऑनलाईन पद्धतीने मुल्यामापन केले जाणार असल्याचे परीक्षा नियंत्रक डॉ. संदीप कडू यांनी स्पष्ट केले आहे.

# सातवीच्या 'एनसीईआरटी'च्या पुस्तकातून मुघलांचा इतिहास हद्दपार

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – 'एनसीईआरटी'च्या सामाजिक शास्त्र विषयाच्या इयत्ता सातवीच्या पुस्तकातून मुघल आणि दिल्ली राजवटीचे सर्व संदर्भ हटवण्यात आले आहेत. याबदल्यात या पुस्तकांमधून विद्यार्थ्यांना सरकारी योजना तसेच महाकुंभासारखे विषयांवर धडे गिरवावे लागणार आहेत.

एनसीई आरटीच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, 'एनसीईआरटी'च्या सामाजिक शास्त्र विषयाच्या इयत्ता सातवीच्या पुस्तकातून मुघल आणि दिल्ली राजवटीचे सर्व संदर्भ हटवून त्याऐवजी सरकारी योजनांसारखे विषयांचा नवीन अभ्यासक्रमात समावेश केला जाणार आहे. प्रकाशित झालेले पुस्तक- 'एक्सप्लोरिंग सोसायटी : इंडिया अँड बियाँड' हे सुधारित अभ्यासक्रमाचा केवळ पहिला भाग आहे. तर दुसरा भाग आगामी महिन्यांत प्रकाशित होण्याची अपेक्षा आहे. मात्र, वगळलेला मजकूर दुसऱ्या भागात समाविष्ट केला जाईल का, यावर अद्याप कोणतीही टिप्पणी केलेली नाही. सातवीच्या नवीन 'एनसीईआरटी' पाठ्यपुस्तकांमधून मुघल आणि दिल्ली राजवटीचे सर्व उल्लेख काढून टाकण्यात आले आहेत. याऐवजी, भारतीय राजवंशांवरील प्रकरणे, 'पवित्र भूगोल' आणि इतर अनेक संदर्भ जोडले गेले आहेत. यामध्ये प्रयागराजचा महाकुंभमेळा आणि मेक इन इंडिया आणि बेटी बचाओ, बेटी पढाओ, अटल बोगदा सारख्या सरकारी योजनांचा नवीन इयत्ता सातवी एनसीईआरटीच्या अभ्यासक्रमात समावेश करण्यात आला आहे. या आठवड्यात प्रकाशित झालेली ही पाठ्यपुस्तके नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण आणि राष्ट्रीय अभ्यासक्रम फ्रेमवर्क २०२३ च्या अनुषंगाने तयार करण्यात आली आहेत.

''एक्सप्लोरिंग सोसायटी : इंडिया अँड बियॉन्ड'' या सामाजिक विज्ञान पाठ्यपुस्तकात मगध, मौर्य, शुंग आणि सातवाहन यांसारख्या प्राचीन भारतीय राजवंशांवर नवीन प्रकरणे आहेत, ज्यात ''भारतीय नीतिमत्ता''वर लक्ष केंद्रित केले आहे.

पुस्तकात आणखी एक नवीन भर म्हणजे ''जमीन कशी पवित्र होते'' हे प्रकरण आहे जे भारतात आणि बाहेर इस्लाम, ख्रिश्चन, यहुदी आणि झोरोस्ट्रियन, हिंदू, बौद्ध आणि शीख धर्म यासारख्या धर्मांसाठी पवित्र मानली जाणारी ठिकाणे आणि तीर्थस्थळांवर लक्ष केंद्रित करते. या प्रकरणात ''पवित्र भूगोल'' सारख्या संकल्पनांचा परिचय करून देण्यात आला आहे, ज्यामध्ये १२ ज्योतिर्लिंगे, ४धाम यात्रा आणि ''शक्तीपीठे'' सारख्या ठिकाणांच्या जाळ्याचे तपशीलवार वर्णन केले आहे. या प्रकरणात नद्यांचे संगम, पर्वत आणि जंगले यासारख्या पूजनीय ठिकाणांचे तपशीलवार वर्णन केले आहे.

# स्विमिंग पूलमध्ये पोहताना बुडून ९ वर्षांच्या ग्रंथचा मृत्यू

**ठाणे (प्रतिनिधी)** – भाईंदरच्या इंद्रलोक परिसरात मिरा-भाईंदर महापालिकेचे गोपीनाथ मुंडे क्रीडा संकुल आहे. भाईंदर महेश्वरी भवन रोडवर असणाऱ्या एका इमारतीत राहात असलेला नऊ वर्षीय ग्रंथ मुथा गेल्या रविवारी सकाळी ११ वाजताच्या सुमारास या तरण तलावात पोहायला शिकत होता. यावेळी अचानक पाण्यात बुडून त्याचा मृत्यू झाला. या घटनेनंतर येथील सुरक्षेबाबतच्या निष्काळजीबद्दल संपूर्ण शहरवासीयांकडून संताप व्यक्त करण्यात आला. नागरिकांनी रॅली काढून निषेधही व्यक्त केला.



दरम्यान, मिरा-भाईंदर पालिकेने या मृत्यूप्रकरणी व्यवस्थापक कंत्राटदाराला नोटीस बजावली होती. त्यावर त्याने आता आश्चर्यकारक खुलासा सादर केला आहे. हा खुलासा हाती लागला आहे. यात त्याने त्याच्याकडून सुरक्षेच्या दृष्टीने सर्व उपाययोजना करण्यात आल्या होत्या. मात्र, मृत ग्रंथने पोहताना त्याला दिलेले जीवरक्षक साधन काढून टाकले होते. नऊ वर्षीय मृत ग्रंथने तरण तलावात पोहताना त्याला दिलेले जीवरक्षक साधन काढून टाकले होते, असा आश्चर्यकारक खुलासा तरण तलावाच्या कंत्राटदाराने केला आहे. म्हणजेच अप्रत्यक्षरित्या ग्रंथच्या स्वतःच्या चुकीमुळे ही दुर्घटना घडल्याचे कंत्राटदाराने उपरोधिक म्हटले आहे.

# विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी शिष्यवृत्ती योजनेची व्याप्ती वाढवणार –शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे

**मुंबई (प्रतिनिधी)** – राज्यातील पात्र शालेय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनांचा लाभ मिळावा यासाठी विविध शिष्यवृत्ती योजनांचे सक्षमीकरण करण्यात येणार असून अधिकाधिक पात्र विद्यार्थ्यांपर्यंत शिष्यवृत्ती योजना पोहोचवण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. यासाठी आदिवासी विकास विभाग, सामाजिक न्याय व इतर मागास बहुजन कल्याण विभागांच्या समन्वयाने विविध शिष्यवृत्ती योजनांची व्याप्ती वाढवण्यात येणार असल्याचे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी सांगितले.

शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांच्या अध्यक्षतेखाली विविध विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनेच्या सक्षमीकरणाबाबत बैठक घेण्यात आली. या बैठकीस इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक ऊईके, शालेय शिक्षण विभागाचे सचिव रणजितसिंह देओल, आदिवासी विकास विभागाचे सचिव विजय वाघमारे, शिक्षण आयुक्त सचिंद्रप्रताप सिंह, एससीईआरटीचे संचालक राहुल रेखावार तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

शालेय शिक्षण मंत्री भुसे म्हणाले, राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील गुणवंत विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी मिळावी यासाठी केंद्र शासनाच्या शालेय शिक्षण व साक्षरता विभागामार्फत एन.एम.एम.एस. (नॅशनल मीन्स कम मेरिट स्कॉलरशिप) योजना राबवली जाते. राज्यातील एन.एम.एम.एस.ही शिष्यवृत्ती परीक्षा उत्तीर्ण झालेले, पण केंद्र सरकारची शिष्यवृत्ती अप्राप्त असलेल्या विद्यार्थ्यांसाठी सारथीच्या धर्तीवर शिष्यवृत्ती योजना सुरू करण्यात येणार आहे.

केंद्र शासनाच्या शिष्यवृत्ती योजनेंतर्गत लाभार्थी विद्यार्थ्यांची संख्या वाढविणे, राज्य शासनाच्या शिष्यवृत्ती योजनांच्या लाभार्थी संख्येत वाढ करण्यावर भर देण्यात येणार आहे. राज्यातील एकही पात्र विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहू नये, यासाठी पहिली ते बारावीपर्यंत विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीच्या रकमेत वाढ करण्याचा तसेच उत्पन्न मर्यादाही पुनर्रचित करण्याचा प्रस्ताव तातडीने तयार करण्याचे निर्देशही शालेय शिक्षण मंत्री भुसे यांनी यावेळी दिले.

आदिवासी विकास मंत्री डॉ.ऊईके यांनी 'सुवर्ण महोत्सवी शिष्यवृत्ती योजनेबाबत नमूद करत सर्व विभागांच्या शिष्यवृत्ती योजनेत समानता असली पाहिजे व जास्तीत जास्त आदिवासी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनेचा लाभ मिळाला पाहिजे असे सांगितले. इतर मागास बहुजन कल्याण मंत्री सावे म्हणाले, आर्थिक अडचणींमुळे विद्यार्थ्यांचे शिक्षण अर्धवट राहू नये आणि त्यांना दर्जेदार शिक्षण घेता यावे यासाठी शिष्यवृत्ती योजनांच्या सक्षमीकरणावर भर देण्यात येणार आहे.

# ताडी प्याल्याने तरुणाचा मृत्यू

**पुणे (प्रतिनिधी)** – पुण्यात एका तरुणाचा केमिकल मिश्रित ताडी पिल्याने मृत्यू झाला. या घटनेमुळे गावातील महिला प्रचंड संतापल्या. कारण अशा ताडीमुळे याआधीदेखील मृत्यूच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे संतापलेल्या महिलांनी जिथे अशाप्रकारची ताडी बनवली जाते तिथे जास्त तोडफोड केली. महिलांनी रस्त्यावर उतरत याविरोधात जोरदार घोषणाबाजीदेखील केली. तसेच ताडी केंद्रावर मोर्चा नेत जोरदार घोषणाबाजी केली. महिलांचा संताप पाहून ताडी बनवणाऱ्यांची चांगलीच भंबेरी उडाली. पोलिसांनी अशा ताडी केंद्रांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी महिलांनी केली. या घटनेचे व्हिडीओ आता सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत.

भोर तालुक्यातील अंगसुळे गावात केमिकल मिश्रित ताडी पिल्याने २४ वर्षीय विजय शेडगे या तरुणाचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या घटनेने गावात एकच खळबळ उडाली आहे. तसेच गावकऱ्यांमध्ये संतापाचे वातावरण आहे. विजय शेडगे असं मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव आहे.

या घटनेने गावातील महिलांचा संयम सुटला आणि त्यांनी ताडी विक्री केंद्र आणि अवैध दारूच्या दुकानांची तोडफोड केली. अनेक तरुण अवैध ताडी आणि दारूच्या व्यसनाच्या आहारी गेले आहेत. यामुळे गेल्या काही वर्षांत ४ ते ५ तरुणांचा मृत्यू झाला असून, अनेक कुटुंबे उद्ध्वस्त झाली आहेत. या पार्श्वभूमीवर, महिलांनी थेट कारवाईचा पवित्रा घेत ताडी तयार करणाऱ्या दुकानातील बॅरल रस्त्यावर ओतले आणि गावातील दोन अवैध दारू विक्रीच्या दुकानांची तोडफोड केली.

# परदेशात वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची चिंता मिटली; प्रोव्हिजनल रजिस्ट्रेशन सर्टिफिकेटचा मार्ग मोकळा

**पुणे (प्रतिनिधी)** – वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी ताबडतोब अधिकाऱ्यांना महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलसोबत संपर्क साधून परदेशात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना लवकरात लवकर मदत होईल, तसेच कोणताही त्रास होऊन नये यासाठी आवश्यक ती कार्यवाही त्वरित करण्याचे आदेश दिले आहेत. परदेशात वैद्यकीय शिक्षण पूर्ण केलेल्या या विद्यार्थ्यांना पुढील काही तासातच आवश्यक पेमेंट लिंक महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलच्या वतीने पाठविण्यात आल्या आणि सर्वांचा जीव भांड्यात पडला.

अनेक विद्यार्थ्यांना हे सर्टिफिकेट देण्याची प्रक्रिया सुरु झाली आहे. अंदाजे सोळाशेहुन अधिक विद्यार्थ्यांना याचा फायदा होणार आहे. ज्या पद्धतीने वैद्यकीय शिक्षण क्षेत्रातील या विद्यार्थ्यांना दिलासा देण्याचे काम राज्यमंत्री माधुरी मिसाळ,आमदार उमा खापरे आणि उपमहापौर तुषार हिंगे यांनी केले. यासाठी सर्व विद्यार्थी आणि पालकांनी त्यांचे आभार मानले. विद्यार्थ्यांचे प्रोव्हिजनल रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट काढण्याचे काम सुरु विद्यार्थ्यांचे प्रोव्हिजनल रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट काढण्याचे काम सुरु असून आणि ते लवकरच विद्यार्थ्यांना पाठविण्यात येतील असे महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलच्या प्रतिनिधीने सांगितले आहे.

परदेशात वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे, त्याचबरोबर या विद्यार्थ्यांच्या सर्टिफिकेशन व इतर गोष्टींची पूर्तता करण्यामधील अडचणींमध्येही दिवसेंदिवस वाढ होताना दिसते. परदेशातून वैद्यकीय शिक्षण घेऊन आलेल्या विद्यार्थ्यांना भारतामध्ये आल्यानंतर पुन्हा मेडिकल कौन्सिल ऑफ इंडिया तर्फे घेतली जाणारी परीक्षा द्यावी लागते, ती परीक्षा पास झाल्यानंतरच या विद्यार्थ्यांना भारतामध्ये इंटर्नशिप करता येते.

सध्याच्या प्रचलित नियमानुसार सदर इंटर्न चालू झाल्यावर या विद्यार्थ्यांना मेडिकल कौन्सिल ऑफ महाराष्ट्र यांच्याकडून ९० दिवसांमध्ये प्रोव्हिजनल रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट मिळणे अपेक्षित असते, परंतु पदव्युत्तर शिक्षणासाठीची प्रवेश परीक्षेची अर्ज भरण्याची प्रक्रिया १७ एप्रिल रोजी सुरु झाली असून ७ मे पर्यंत सुरु राहणार आहे. त्यासाठी अंतिम तारीख १५ ते २० दिवसांवरती येऊन ठेपलेली असताना देखील हे प्रोव्हिजनल रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल कडून अनेक विद्यार्थ्यांना मिळाले नव्हते त्यासाठीची शुल्क आकारणी देखील चालू करण्यात आली नव्हती.

वैद्यकीय क्षेत्रातील पदव्युत्तर शिक्षणासाठीची चढाओढ बघता या अतिशय महत्त्वाच्या काळात अनेक विद्यार्थी प्रवेश परीक्षेचा अभ्यास करायचा सोडून या प्रोव्हिजनल रजिस्ट्रेशन सर्टिफिकेटच्या मागे धावपळ करताना दिसत होते. त्यामुळे क्षमता असताना देखील आयुष्यातील या महत्त्वाच्या टप्प्यावरील परीक्षेसाठी असणारा अमूल्य वेळ या विद्यार्थ्यांना वाया घालवावा लागत होता. ही सर्व व्यथा घेऊन हे विद्यार्थी-पालक भाजपा युवा मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष तुषार हिंगे यांना भेटले. त्यांनी प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेत त्यांनी भाजपच्या विधानपरिषद आमदार उमा खापरे यांच्याशी संपर्क साधला आणि त्यांना सदर परिस्थिती सांगितली.

आमदार खापरे आणि विद्यार्थी पालकांची भेट घालून देताच तात्काळ खापरे यांनी संबंधित खात्याच्या राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्याशी संपर्क साधला आणि या विषयावर तातडीने कार्यवाही करण्याची विनंती केली होती.

# गाईंना गुंगीचे औषध देऊन तस्करी करण्याचा प्रयत्न

**बीड (प्रतिनिधी)** – गाईंना गुंगीचे औषध देऊन त्यांना पळवण्याचा प्रयत्न करणाऱ्यांवर आता कारवाई करण्यात येणार आहे. राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी बीड पोलीस प्रशासनाला सूचना दिल्या आहेत. या आरोपींना तात्काळ अटक करून कारवाई करण्याच्या सूचना पंकजा मुंडे यांनी दिल्या. परळीतील स्नेहनगर भागात गुंगीचे औषध देऊन गाईंना चोरण्याचा प्रयत्न काही चोरट्यांनी केला होता.

शहरातील स्नेहनगर भागात शुक्रवारी रात्री गायींना खाण्याच्या पदार्थांमधून औषध देण्याचा संतापजनक प्रकार घडला. गायींना बेशुद्ध करून त्यांची तस्करी करण्याचा अज्ञात चोरट्यांचा प्रयत्न होता, असा संशय स्थानिक रहिवाशांना आला. त्यांनी सतर्कता दाखवून हा प्रयत्न हाणून पाडला.

राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांना हा प्रकार समजताच त्यांनी तातडीने पोलीस अधीक्षक आणि स्थानिक पोलीस निरीक्षक यांच्याशी संपर्क साधला. या प्रकारामागे जे कोणी असतील त्यांना तातडीने अटक करून कडक कारवाई करण्याच्या सूचना दिल्या.

गुंगीचे औषध मिश्रित पदार्थ खाल्याने ज्या गायी बाधित झाल्या होत्या त्यांच्यावर त्वरेने उपचार करण्याच्या सूचनाही पंकजा मुंडे यांनी दिल्या होत्या. त्यानंतर पशुसंवर्धन अधिकाऱ्यांनी उपचार करून चार गायींना धोक्यातून बाहेर काढले. एका गायीवर अद्याप उपचार सुरू आहेत.


## MOTHER Name Change

My Old Name is SANAYA NOORI which now I am changing as New Name SURAYYA FAYAZ SAYED Henceforth My All Correspondence will be done as per my new name. Please consider the same AD- PANSARE NAGAR NAIGAON DIST NANDED MAHARASHTRA MO.9423442425 9421767786

## FATHER Name Change

My Old Name is SANAYA NOORI which now I am changing as New Name FAYAZ RAHIM SAYED Henceforth My All Correspondence will be done as per my new name. Please consider the same AD- PANSARE NAGAR NAIGAON DIST NANDED MAHARASHTRA MO.9423442425 9421767786

## Change In Name

My Old Name is SANAYA NOORI which now I am changing as New Name SANAYA FAYAZ SAYED Henceforth My All Correspondence will be done as per my new name. Please consider the same AD- PANSARE NAGAR NAIGAON DIST NANDED MAHARASHTRA MO.9423442425 9421767786

## जाहीर प्रगटन

जयवंतराव भुसारे रा. विष्णु नगर, नांदेड यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरुन मी खालील प्रमाणे सर्व जनतेस व संबंधीतांना या जाहिर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, माझे पक्षकार नामे गणेश जाहिर प्रगटन देत आहे. माझे पक्षकार यांनी श्री साईनाथ राजु यन्नावार (मुख्त्यारआम) रा. शंकरनगर वसरणी ता.जि.नांदेड यांच्याकडुन श्री. पांडुरंग गंगाधरराव चक्रवार रा.होळी, नांदेड यांच्या मालकी व ताब्यातील स्वकष्टार्जीत मिळकत विकत घेण्याचा करार केला आहे. सदरील मिळकतीचे वर्णन मौजे वसरणी ता.जि. नांदेड, नां.व.श. मनपा हद्दीतील सर्वे नं.६/२ पैकी एक प्लॉट नं. १४ आहे. ज्याचा साईज ४०३० ज्याचे एकुण क्षेत्र १२०० चौ फुट ज्याची चतु:सिमा पुर्वेस २० फुट रुंद रोड आहे, पश्चिमेस-प्लॉट नं.१० व ११ चा भाग आहे. दक्षिणेस- प्लॉट नं. १५ आहे, उत्तरेस - प्लॉट नं. १३ आहे.

वरील वर्णनाचा प्लॉट माझे पक्षकार यांनी संपुर्ण आंतरीक व बाहय हक्कासह कायमचे खरेदी करण्याचा करार करुन विक्रेत्याला बयाना रक्कम देवून सौदाचिठ्ठी करुन घेतली आहे व लवकरच उर्वरीत रक्कम देवून माझ्या पक्षकाराच्या हक्कात किंवा ते सांगतील त्या व्यक्तीच्या नावे कायमचे विक्रीखत करुन घेण्याचे ठरले आहे.

तरी सर्व जनतेस व संबंधीतांना या जाहिर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, वरील व्यवहारा बद्दल व मालमत्तेबाबत, कोणाचे ही कोणत्याही प्रकार हक्कसंबंध, वारस अधिकार, आक्षेप वा उजर जसे पूर्व करार,सौदाचिठ्ठी, कुळ, गहाण, भाडेपट्टा, तसेच कर्जबोझा, शासकीय व निमशासकीय असल्यास सदरील जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ०७ दिवसाच्या आत संपुर्ण कागदपत्रासह माझ्या पत्यावर लेखी स्वरुपात आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणाचेही काही आक्षेप व उजर न आल्यास सदरील व्यवहारास कोणाचेही काही एक आक्षेप नाही असे गृहीत धरुन वरील मालमत्तेचे व्यवहार पुर्ण करुन नोंदणीकृत विक्रीखत करुन घेण्यात येईल. मुदतीनंतर आलेले आक्षेप ग्राहय धरले जाणार नाही व माझ्या पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.सबब हे जाहिर प्रगटन.

मार्फत
ॲड.एफ.एम.खान
नांदेड मो.९८२३२१०६६३

जाहीर प्रगटन देणार
गणेश जयवंतराव भुसारे
रा.विष्णूनगर नांदेड

## टी.सी.हरवली

माझी कु. रोशनी मारोती दावलेकर या नावाची इयत्ता ७ वी पासची टी. सी. वर्कशॉप ते शिवाजीनगर दरम्यान प्रवासात हरवली आहे. कोणाला सापडली असेल तर कृपया खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

संपर्क पत्ता-मारोती दावलेकर,
विष्णूनगर, नांदेड मो. ९२८४२४९०४८


## टी.सी.हरवली

माझी निरंजन दता कौशल्य या नावाची नववी ९ पास टि.सी व मुळ कागदपत्रे हडको ते लातुर फाटा दरम्यान प्रवासात हरवली आहेत,कोणास सापडल्यास खालील मोबाईल नंबर संपर्क साधावा

मो.७५५८६७५५१७

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लॅबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८

## Change In Name

I Riyaj Shaikh father of Mohammed Faizan resident of H. No. 9-7-48 Hyder Bag No. 1, Degloor Naka Nanded-431604. I do here by declare that spelling correction of my son Name from Mohammad Faizan Riyaj Shaikh to Mahammad Faizan Riyaj Shaikh with Immediate Effect

## Change In Name

Riyaj Shaikh Father of Safiha Fateema Resident of H. No 9-7-48 Hyder Bag No-1 Degloor Naka Nanded-431604. I do hear by declare that Spelling Correction of My Daughter Name & Date of Birthfrom Safiha Fateema Riyaz Shaikh to Safiha Fateema Riyaj Shaikh And Birth Date Correction from 30-08-2012 to 31-08-2012 with Immediate Effect

## जाहीर प्रगटन

मौजे वाडी बु नांदेड मनपा हद्दीतील गट नंबर ४२/ बी मधील प्लॉट नंबर ८९ साईज लांबी पुर्व पश्चिम १२.१९ चौरस मीटर व रुंदी दक्षिण उत्तर ९.१४ चौरस मीटरचा प्लॉट संतोष वैजनाथ जाधव रा.लक्ष्मीनगर वडगाव कोल्हाटी ता.जि.औरंगाबाद ह.मु. नांदेड यांचेकडून वाघमारे प्रमोद नाथा रा.झेंडाचौक नांदेड यांनी विकत घेण्याचा सौदा केला असून बयाना म्हणून काही रक्कम दिली आहे.

प्लॉटची.चर्तु:सिमा:-पुर्वेस -सदर सर्व्हे नंबरची जागा, पश्चिमेस -रस्ता, दक्षिणेस- प्लॉट नंबर ९०, उत्तरेस - प्लॉट नंबर ८८ तरी वरील चर्तुसिमेच्या आतील सदनिके बद्दल कोणाचा काही हक्क, उजर, दावा आक्षेप सरकारी किंवा निमसरकारी बोजा असेल त्यांनी आपला उजर/ आक्षेप हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या उजर आक्षेप ग्राहय धरल्या जाणार नाही व नंतर सदनिकेचे खरेदी खत करण्यात येईल. करीता हे जाहीर प्रगटन

जाहीर प्रगटन देणार
प्रमोद नाथा वाघमारे
रा.झेंडाचौक नांदेड ता.जि.नांदेड
मो.८३२९८२०१३६

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस व संबधीतास या जाहीर प्रगटनात कळविण्यात येते की, माझे पक्षकार श्री संदीप दिलीप इंगळे रा.जेतवननगर तरोडा बु. नांदेड यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून हे जाहीर प्रगटन देण्यात येते की, माझ्या पक्षकाराने सौ.अशालता भ्र.इरबा सोनकांबळे रा.सप्तगिरी कॉलनी तरोडा बु.नांदेड यांच्या मालकी व ताब्यातील जेतवन मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण संस्था म.तरोडा बु.ता.जि.नांदेड येथील मनपा हद्दीतील शेत सर्व्हे नंबर ७० गट नंबर २४० मधील एक प्लॉट नंबर ७ ज्याची साईज ३० बाय ४० चौरस फुट असून एकूण क्षे.१२०० चौरस फुट आहे.त्यापैकी दक्षिणेकडील अर्धाभाग ज्याची साईज १५ बाय ४० चौरस फुट आहे. एकूक्ष क्षे.६०० चौरस फुट असून चर्तुसिमा पुढील प्रमाणे पुर्वेस- कॉलनी रोड, पश्चिमेस-विकासनगर, दक्षिणेस-प्लॉट नंबर ६ उत्तरेस- उर्वरीत १५ बाय ४० प्लॉट

येणे प्रमाणे चर्तुसिमेच्या आतील वर्णनाचा प्लॉट सौ.अशालता भ्र.इरबा सोनकांबळे यांच्या विकत घेण्याचे निश्चित केले आहे. तरी वरील प्लॉट बाबत कोणाचा काही आक्षेप, उजर, मालकी हक्क, देवाण घेवाण, कुळ कर्ज असल्यास हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासनू ७ दिवसाच्या आत आपला आक्षेप दाखल करावा.मुदत संपल्यावर कोणाचाही आक्षेप नाही असे ग्राहय धरून सदर प्लॉटची रजिस्ट्री करून घेण्यात येईल.मुदतीनंतर आलेला आक्षेप स्वीकारल्या जाणार नाही.करीता हे जाहीर प्रगटन.

मार्फत
ॲड.एच.जी.सोनकांबळे
रा.सप्तगिरी कॉलनी तरोडा
नांदेड

जाहीर प्रगटन देणार
संदीप दिलीप इंगळे
रा.जेतवननगर तरोडा बु.नांदेड
मो.९०९६९५६६१५,९०७५५४७४५७






# गोदातीर समाचार









## व्यंगचित्रांच्या अद्‌भूत दुनियेची अनोखी सफर

**नांदेड (प्रतिनिधी)–** वर्तमानपत्रे आणि नियतकालिकांमुळे व्यंगचित्रं ही सर्वसामान्यांच्या तशी परिचयाचीच झाली आहेत. चित्र आणि शब्दांचा वापर करीत व्यंगचित्रं ही आजूबाजूच्या घटना-घडामोडींवर भाष्य करतात. ती पाहून आपण हसतो आणि पुढे जातो. पण त्यांच्यातील बारकावे आणि सौंदर्यस्थळे ही आपल्या नजरेतून सुटतात. असे होण्याचे मुख्य कारण म्हणजे व्यंगचित्रांकडे पाहाण्याची आपली दृष्टी आपल्याकडे नसते. नेमकी हीच दृष्टी विकसित करण्याचा प्रयत्न प्रसिद्ध चित्रकार प्रा. गणेश बोबडे (नागपूर) आणि व्यंगचित्रांचे संग्राहक-अभ्यासक आणि ज्येष्ठ लेखक मधुकर धर्मापुरीकर यांनी एका अनोख्या दृकश्राव्य कार्यक्रमाद्वारे केला.

नरहर कुरुंदकर प्रगत अध्ययन व संशोधन केंद्राच्या वतीने व्यंगचित्रकलेतील विनोद आणि चित्रकला या विषयावर या दोन्ही मान्यवरांनी निवडक व्यंगचित्रांच्या आधारे भाष्य केले. नॉर्मन थेलवेल, अँद्रे फ्रान्स्वा, ब्रूस वॉकर या परदेशी आणि आर.के. लक्ष्मण, सुधीर दर, आणि वसंत सरवटे या भारतातील नामवंत व्यंगचित्रकारांच्यासह इतर नामांकित मंडळींच्या प्रत्येकी एक व्यंगचित्राच्या



सहाय्याने त्यांनी आपले विवेचन सादर केले. या दोन्ही मान्यवरांनी व्यंगचित्रांकडे कसे पहायचे एवढेच सांगितले नाही तर व्यंगचित्रांमध्ये काय पहायचे हे देखील उपस्थितांच्या निदर्शनास आणून दिले. त्यांच्या या प्रयत्नाला धर्मापुरीकर यांनी व्यंगचित्र साक्षरता असे समर्पक नाव दिले.

प्रा. बोबडे यांनी शास्त्रोक्त संगीतात जशी घराणी असतात तशी व्यंगचित्रकलेत रेषांची देखील घराणी असतात ही बाब नमूद केली. कोणी रेषांचा मुबलक वापर करतो तर कोणी सूचक वापर करतो. कोणी रंगाच्या आधारे व्यंगचित्र फुलवतो तर कोणी परिणामकारकता साधण्यासाठी रंगाचा वापर टाळतो. काहींच्या व्यंगचित्रांमध्ये तपशीलांची रेलचेल असते तर काही ते टाळतात. असे अनेक बारकावे त्यांनी या वेळी उलगडून दाखविले. विविध व्यंगचित्रांमध्ये माणसे आणि प्राणी यांचे हावभाव कसे अचूक टिपले आहेत हे त्यांनी दाखवून दिले. यासाठी चित्रकाराला शरीरशास्त्राची उत्तम जाण हवी ही बाब प्रा. बोबडे यांनी अधोरेखित केली.

या वेळी बोलता धर्मापुरीकर यांनी व्यंगचित्रांकडे समाज केवळ करमणुकीचे साधन पाहातो अशी खंत व्यक्त केली. त्यांनी हसविलेच पाहिजे असा आग्रह धरणे हा व्यंगचित्रकलेवर आणि व्यंगचित्रकारावर अन्याय करणे होय असे त्यांनी ठामपणे सांगितले. उलट ती पाहिल्यावर आपण विचारात पडलो पाहिजे असे ते म्हणाले. चांगले व्यंगचित्र कोणते हे कसे ठरवायचे याबद्दल देखील धर्मापुरीकर यांनी चर्चा केली. शारीरिक व्यंगांची थट्टा करणाऱ्या व्यंगचित्राला चांगले म्हणता येत नाही आणि जे परिणामकारता साधते तेच उत्तम व्यंगचित्र होय असे त्यांनी सांगितले. उत्तम व्यंगचित्रकार हा मूलतः एक चांगला कथाकार असतो कारण त्याला त्याच्या कलाकृतीतून काहीतरी सांगायचे असते ही बाब देखील त्यांनी यावेळी नोंदविली.

## एकाला जबर मारहाण; सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)–** भोकर फाटा येथे एकाला जबर मारहाण करण्यात आली. ही घटना २६ एप्रिल रोजी रात्री साडेदहाच्या सुमारास घडली. या प्रकरणी सहा जणांविरुद्ध अर्धापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नांदेड शहरातील गंगाधर शंकरराव मुळे यांना योगेश ठाकूर, संदीप राणा व त्याच्या इतर साथीदारांनी शिवीगाळ करत थापड बुक्क्या व लोखंडी रॉड, फायटर व बेल्टने जबर दुखापत केली. त्यांच्याकडील नगद रक्कम, दागिने असा तीन लाख ८० हजारांचा ऐवज जबरीने चोरून घेतला. शंकराव मुळे यांच्या फिर्यादीवरून योगेश ठाकूर, संदीप राणा व इतर सहा साथीदारांविरुद्ध गंभीर दुखापत व जबरी चोरी केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस सहाय्यक पोलीस निरीक्षक कराळे करत आहेत.

## पाकिस्तानचे पाणी बंद केल्याचा उल्लेख पंतप्रधानांनी काढलेल्या 'त्या'पत्रात नाही –ॲड. प्रकाश आंबेडकर

**नांदेड (प्रतिनिधी)–** पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत सरकारकडून पाकिस्तान विरोधात कडक पावले उचल्याचे सांगितले जात आहे. यात सिंधू जल करार रद्द करण्याचा निर्णय भारताने घेतला आहे. मात्र, या संदर्भात सरकारने काढलेल्या त्या पत्रात याबाबत कोणताही स्पष्ट उल्लेख नाही, यामुळे हा करार रद्दचा निर्णय संशयास्पद असल्याचा दावा वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष ॲड. प्रकाश ऊर्फ बाळासाहेब आंबेडकर यांनी केला. तर पुलवामा व पहलगाम घटनांबाबत पंतप्रधान गंभीर नाहीत, असा घणाघाती आरोपही ॲड. आंबेडकर यांनी यावेळी केला.

पानभोसी येथील एका कार्यक्रमानिमित्त ॲड. प्रकाश आंबेडकर नांदेड दौऱ्यावर सोमवारी आले होते. यावेळी त्यांनी



पत्रकारांशी संवाद साधला. ॲड. आंबेडकर म्हणाले की, इंडस अर्थात सिंधू जल करार भारतानं रद्द केल्याचं जाहीर केलं, पण यासाठी ज्या सचिवाच्या सहीनं पत्र काढण्यात आलं आहे. त्यातील मुद्दा क्रमांक पाच हा संशयास्पद आहे. पाकिस्तान थेंब थेंब पाण्यासाठी तरसेल, हे भाजपचे फेक नरेटीव्ह आहे. यासंदर्भात भारत सरकारनं जारी केलेले पत्रच ॲड. आंबेडकर यांनी वाचून दाखवले.

ते म्हणाले, या पत्रामध्ये पाचवा जो कॉलम आहे, तो सगळ्यात महत्त्वाचा असं मी मानतो. दी गव्हर्मेंट ऑफ इंडिया हिअर बाय डिसाईड्स, देंट इंड्स वॉटर ट्रीटी १९६० विल बी हेल्ड इन अवेयन्स विथ इमिजेट इफेक्ट. हे पत्र २४ एप्रिलला लिहिलेलं आहे. पत्र लिहिणारे गव्हर्नमेंट ऑफ इंडियाचा सेक्रेटरी देवाशिष मुखर्जी आहेत. त्यांनी हे पत्र सय्यद अली मूर्तझा (सेक्रेटरी मिनिस्ट्री ऑफ वॉटर रिसोर्स, पाकिस्तान) यांना लिहिले आहे.

ॲवेयन्स याचा अर्थ कोर्टामध्ये स्टेटस्को म्हणजे धड तुझंही नाही आणि माझंही नाही, तुला जसा अर्थ काढायचा असेल तसा अर्थ काढ, असा या अवेयन्स शब्दाचा अर्थ मी काढतो. त्याच्यामुळं आम्ही तुमचे पाणी थांबवले आहे, थांबवणार आहोत, असा कुठंही उल्लेख केलेला नाही, असेही ॲड. बाळासाहेव आंबेडकर यांनी सांगितले.

## जप्त केलेल्या गाड्या मालकांनी ओळख पटवून घेऊन जाव्यात –शहर वाहतूक शाखेचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)–** जप्त करण्यात आलेल्या वाहनांची यादी नांदेड जिल्हा पोलीस दलाच्या संकेतस्थळावर (www.nandedpolice.gov.in) तसेच नांदेड फेसबूक पेज (Nanded Police), इंस्टाग्राम (sp nanded police) व (Twitter Police) वर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. गाडी मालकांनी आपल्या गाडीची ओळख पटवून घेऊन जावी, असे आवाहन शहर वाहतूक शाखेने केले आहे.

पुढील दोन दिवसांच्या आत सदर वाहने आपली किंवा आपल्या नातेवाईकांची असल्यास त्या वाहनांची मालकी हक्काची ओळख पटवून घेवून जावी. अन्यथा अशा सर्व वाहनांवर कोणाचाही मालकी हक्क नाही असे गृहित धरुन लिलाव करण्यात येईल याची वाहनधारकांनी नोंद घ्यावी.

या बाबत काही अडचण किंवा समस्या असल्यास शहर वाहतुक शाखा वजिराबाद, नांदेड यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन पोलीस निरीक्षक साहेबराव गुट्टे यांनी शहरातील गाडी मालकांना केले आहे.

## दिव्यांगांचे जिल्हाधिकाऱ्यांचा प्रवेशद्वारासमोर झोपा काढो आंदोलन

**नांदेड (प्रतिनिधी)–** विविध प्रलंबित मागण्यांच्या अनुषंगाने बेरोजगार दिव्यांग कल्याणकृती संघर्ष समितीच्या वतीने जिल्हा नियोजन भवन जिल्हाधिकारी कार्यालयासमोर झोपा काढो आंदोलन करण्यात आले. पाच तास सुरू झालेल्या आंदोलनाची सांगता निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर यांनी पत्र दिल्यानंतर करण्यात आली.



जिल्हाधिकारी नांदेड यांच्या मार्फत आयुक्त राज्य सेवा हक्क आयोग छत्रपती संभाजीनगर यांना दिले होते. या निवेदनातील एकूण १६ मागण्यांच्या अनुषंगाने बेरोजगार दिव्यांग कल्याणकृती संघर्ष समितीच्या वतीने सोमवार दि. २८ एप्रिल रोजी सेवा हक्क दिनी जिल्हा नियोजन भवन जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शेकडो दिव्यांगांनी 'आमच्यासाठी कुठल्याच सेवा हक्क नाहीत का, याचा जबाब द्या' म्हणत एकापेक्षा अनेक आंदोलन करण्यात आले.

बेरोजगार दिव्यांग कल्याणकृती संघर्ष समितीचे अध्यक्ष राहुल साळवे, उपाध्यक्ष आदित्य पाटील, युवा अध्यक्ष कार्तिक कुमार भरतिपुरम आणि शहराध्यक्ष सय्यद आरिफ यांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर आंदोलन केले.

वजिराबाद पोलीस निरीक्षक परमेश्वर कदम यांनीही दिव्यांगाशी चर्चा करून वरिष्ठ पातळीवर आपल्या भावना पोहोचू असा विश्वास दिला व त्यांच्या पाठपुराव्यानंतर आरडीसीकडून दिव्यांगाना पत्र मिळाले. त्यानंतर आंदोलनाची सांगता करण्यात आली.

यावेळी राहुल साळवे, चंपतराव डाकोरे, आदित्य पाटील, संजय धुलधाणी, शिवराज बंगरवार, प्रदिप हणवते, शेख उमर, विष्णु जायभाये, शेख आतिक हुसेन, रवी कोकरे, हसन खान, दिनेश डुमने, शेख एजाज, मोहम्मद सिराज, मधुकर वाघमारे, शेख अलिम, शेख सादिक, शिवाजी सुर्यवंशी, कार्तिक भरतीपुरम, भोजराज शिंदे, सय्यद सदाम, मोहसीन खादरी, सय्यद आरिफ, नागनाथ कामजळगे, व्यंकट कदम, हणमंतराव राऊत, राजु इरावतीन, प्रशांत हणमंते, अजय गोरे, मिलिंद सितळे, अफरोजा खान, भाग्यश्री नागेश्वर, सविता गवते, कल्पना सकते यांनी सहभाग घेतला.

## नागोराव पांचाळ पावडेवाडीकर यांचे निधन

**नांदेड (प्रतिनिधी)–** वृतपत्र विक्रेते ज्ञानेश्वर पांचाळ यांचे



वडील नागोराव माधवराव पांचाळ पावडेवाडीकर (वय ६०) यांचे सोमवारी (दि.२८) दुपारी तीन वाजता राहत्या घरी निधन झाले. त्यांच्यावर दि. २९ रोजी सकाळी ९ वाजता गोवर्धन घाट नांदेड येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, नातवंडे असा परिवार आहे.







**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com